cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१०० | बुधवार दि.३१ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### जबाबदारीचे भान सगळ्यांनीच ठेवावे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (२८ जुलै) 'मन की बात' या आपल्या नियमित कार्यक्रमात जनतेला संबोधित करताना काही महत्त्वाच्या विषयांवर जनतेशी संवाद साधला. आपल्या भाषणात त्यांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. राजस्थानच्या 'कुल्हाडी बंद पंचायत' मोहिमेचा उल्लेख करताना जंगलतोड थांबवणे तसेच खादीचा प्रचार करण्यावरही भर दिला. जंगलतोडीचे दुष्परिणाम आता सर्वविदीत झाले आहेत तरीही झाडांची हत्या सुरूच आहे. ती थांबवायला हवी. यासाठी कोणीतरी पुढाकार घ्यायला हवा होता. राजस्थानच्या रणथंबोर येथून 'कुल्हाडी बंद पंचायत' मोहिमेची सुरुवात झाली आहे.

### वायनाडमध्ये भूस्खलनाने हाहाकार; मृतांचा आकडा १०० वर

वायनाडः केरळमधील वायनाड जिल्ह्यातील मेप्पडीजवळील डोंगराळ भागात सोमवारी मध्यरात्री भूस्खलन झाले. या नैसर्गिक आपत्तीमुळे आतापर्यंत सुमारे १०० जणांचा मृत्यू झाला आहे तर १२८ जण जखमी आहेत, अशी माहिती केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी दिली. दरम्यान, ढिगाऱ्याखाली शेकडो लोक अडकल्याची भीती आहे. लष्करासह–एनडीआरएफचे मदतकार्य सुरु असून, पावसाचा जोर कायम असल्याने मदतकार्यात अडथळे येत आहेत. वायनाडमधील भूस्खलनाबाबत केरळचे मुख्य सचिव डॉ. व्ही. वेणू यांनी सांगितले की, परिस्थिती अजूनही गंभीर आहे. अजूनही बरेच लोक बेपत्ता आहेत. त

# शेतकऱ्यांना चुचकारण्याचा प्रयत्न!

## हरियाणातील निवडणुकिच्या तोंडावर चर्चा करण्यास तयार

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

हमीभाव कायद्यासह इतर मागण्यांसाठी हरियाणा आणि पंजाबमधील शेतकरी १३ फेब्रुवारीपासून आंदोलन करत आहेत. संयुक्त किसान मोर्चा आणि किसान मजदूर मोर्चाच्या (बिगर–राजकीय) नेतृत्वाखाली हजारो शेतकरी शंभू आणि खनौरी सीमेवर आंदोलनास बसले आहेत. गेल्या सहा महिन्यापासून आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणारे हरियाणा सरकार आता शेतकरी ◀◀ पान २ वर

### आंदोलनाच्या कार्यक्रमाच्या तारखा

१ ऑगस्ट : नवीन फौजदारी कायद्याच्या प्रती जाळणे आणि जिल्हा मुख्यालयावर निदर्शने. १५ ऑगस्ट : दिल्लीकडे देशव्यापी ट्रॅक्टर मोर्चा, यासाठी शेतकऱ्यांना शंभूसह सीमेवर एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. २१ ऑगस्ट : किसान आंदोलन २.० ला २०० दिवस पूर्ण झाल्याचा उत्सव. ३१ ऑगस्ट : शंभू सीमेवर आंदोलनाला २०० दिवस पूर्ण झाल्याचा आनंदोत्सव. १५ आणि २२ सप्टेंबर : हरियाणातील जिंद आणि पिपली येथे शेतकऱ्यांची रॅली.

### राहुल गांधी यांची भेट

हमीभाव कायद्यासह इतर प्रमुख मागण्यांसाठी शेतकरी आंदोलन करत आहेत. तर शेतकरी दिल्लीत जाण्याची मागणी करत आहेत. मात्र हरियाणा पोलिसांनी रस्त्यांवर खिळे ठोकून बॅरिकेड्स लावले आहेत. त्यामुळे शंभू आणि खनौरी सीमेवर शेतकरी तटस्थ उभे असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची वाट पाहत आहेत. यादरम्यान अलीकडेच शेतकरी नेत्यांच्या प्रतिनिधींनी काँग्रेस खासदार आणि अकाली दलाचे खासदार हरसिमरत कौर यांच्या उपस्थितीत विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची भेट घेतली होती. तसेच सरकारला शेतकऱ्यांच्या प्रश्नावर जाब विचारावा अशी विनंती केली होती. त्यानंतर मंगळवारी (ता.२९) राहुल गांधी यांनी मोदी सरकारला चक्रव्युहावरून चांगलेच धारेवर धरत शेतकऱ्यांचा प्रश्न मांडला.



### शेतकरी आंदोलनाचा कार्यक्रम

गेल्या आठवड्यात, किसान मजदूर संघर्ष समिती आणि युनायटेड किसान मोर्चाच्या (बिगर–राजकीय) बॅनरखाली शेतकरी नेत्यांची दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये राष्ट्रीय परिषद झाली. ज्यामध्ये २० राज्यांतील १५० हून अधिक शेतकरी नेते उपस्थित होते. परिषदेत शेतकरी नेत्यांनी आंदोलनाबाबत पुढील रणनीती सांगताना आंदोलनाच्या कार्यक्रमाच्या तारखा जाहीर केल्या.

## अमित शाह यांच्या भेटीसाठी अजित पवार वेश बदलून कसे गेले?

### सुप्रिया सुळे यांचा सवाल



**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना भेटण्यासाठी मुळात अजित पवार वेश बदलून का जात होते? त्यांच्यात इतके काय शिजत होते? दिल्ली आणि मुंबई विमानतळाची यासंदर्भात चौकशी झाली पाहिजे. अजित पवार नाव आणि वेश बदलून विमानतळावरून कसे गेले? यासाठी त्यांना परवानगी कशी मिळाली? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलताना उपस्थित केला. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राज्याचे तत्कालीन विरोधी पक्षनेते नाव बदलून प्रवास करतात. ◀◀ पान २ वर

## पूजा खेडकरांना अटकपूर्व जामीन नाहीच

नवी दिल्लीः प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांनी अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणी पुन्हा लांबणीवर पडली आहे. आता यावर दिल्लीच्या पटियाला हाऊस कोर्टात बुधवार,दि. ३१ जुलै रोजी सुनावणी होणार आहे.



पूजा खेडकर यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी शुक्रवार, १९ जुलै रोजी गुन्हा दाखल केला होता. मर्यादेपेक्षा जास्त वेळा परिक्षा देऊन आयोगाची फसवणूक केल्याप्रकरणी, तसेच खोटी ओळख सांगितल्याप्रकरणी केंद्रीय लोकसेवा आयोगाने (युपीएससी) खेडकर यांच्याविरुद्ध ◀◀ पान २ वर

## नोंदणी प्रक्रियेबाबत सर्वोच्च दिलासा

नवी दिल्ल : कायदा शाखेच्या पदवीधरांना वकील म्हणून नाव नोंदणी करण्यासाठी राज्य बार कौन्सिल हे अवाजवी शुल्क आकारू शकत नाही. अशाप्रकारचे शुल्क आकारणे म्हणजेआर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांतील उमेदवारांना अनिश्चित काळासाठी देण्यात आलेली व्यवस्थात्मक सापत्न वागणूक ठरेल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. समानतेसाठी प्रतिष्ठा हा देखील तितकाच महत्त्वाचा घटक असल्याचे न्यायालयाकडून ◀◀ पान २ वर

# आरक्षणाच्या शिंदे समितीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

## आता विधानसभेनंतरच अहवाल; नोंदी तपासणे सुरुच राहणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील मराठा आरक्षणाचा प्रश्न गंभीर बनला असतानाच आता पुन्हा एकदा राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात गठीत केलेल्या शिंदे समितीला मुदतवाढ दिली आहे. विशेष म्हणजे आता या समितीला थेट ३१ डिसेंबरपर्यंतची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे, आता मराठा आरक्षणाच्या विषयी या समितीकडून थेट विधानसभा निवडणुकांच्या नंतरच अहवाल सादर केला जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

राज्य सरकारकडून यापूर्वीही अनेकदा या समितीला सरकारकडून मुदतवाढ देण्यात आली होती. आता, थेट ५ महिन्यांची मुदतवाढ दिल्यामुळे, मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण स्थगित करुन आता विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. १३ ऑगस्ट रोजी ते आपली भूमिका जाहीर करणार आहेत. मात्र, तत्पूर्वी सरकारकडून त्यांना आरक्षण व सगेसोयरे अध्यादेशाच्या अंमलबजावणीबाबत अपेक्षा होती. मात्र, या दोन्ही मुद्द्यांवर काम करणाऱ्या समितीला आणखी मुदतवाढ देण्यात आली आहे. मराठा कुणबी नोंदी शोधण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्या. शिंदे समितीला राज्य सरकारने पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करण्यात येत होती. या मागणीला अनुसरून राज्य सरकारने निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्या नेतृत्त्वात एक समिती स्थापन केली आहे, त्या समितीला अहवाद सादर करण्यासाठी सातत्याने मुदतवाढ देण्यात आली आहे. आता, चक्क ५ महिन्यांची मुदतवाढ ◀◀ पान २ वर

### समितीचे आतापर्यंत दोन अहवाल

यापूर्वी न्या. शिंदे समितीचा पहिला अहवाल ३१ ऑक्टोबर रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्वीकारण्यात आला होता. शिंदे समितीला फारशी, उर्दू आणि अन्य भाषेतील दस्तऐवजांचे भाषांतर करण्यासाठी पुरेसा वेळ आहे. त्यासाठी सरकारने समितीला पुन्हा एकदा २९ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. डिसेंबर महिन्यात शिंदे समितीने आपला दुसरा अहवाल सरकारला सादर केला होता.

## प्रकाश आंबेडकर-पंकजा मुंडे यांची लातुरमध्ये भेट

### दोघांमधील भेटीतील चर्चा आली समोर; भाजपच्या संघटनात्मक बैठका पडल्या पार

लातूर: भाजपच्या विधानपरिषदेच्या आमदार पंकजा मुंडे आणि वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांची भेट झाली. लातूर बीड रस्त्यावर या दोन नेत्यांची भेट झाली. यावेळी पंकजा मुंडे यांनी आंबेडकरांच्या आरक्षण बचाव यात्रेला शुभेच्छा दिल्या. याचे फोटो पंकजा मुंडे यांनी शेअर केले आहेत. या भेटीत नेमकी कोणत्या मुद्द्यांवर चर्चा झाली? याचीही माहिती पंकजा मुंडे यांनी दिली आहे. प्रकाश आंबेडकर यांच्याशी झालेल्या भेटीसंदर्भात बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, आमची भेट अत्यंत योगायोगाने झाली होती.



### फडणवीसांचे आरक्षण वाढवण्याचे वक्तव्य जावईशोध–आंबेडकर

गेल्या काही दिवसांपासून मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राज्यातील नेत्यांची टीका, प्रत्युत्तरे येत असताना वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर खोचक टीका केल्याचे दिसून आले आहे. फडणवीसांचा आरक्षण वाढवण्याचे वक्तव्य हा जावईशोध असून एससी एसटी आरक्षण वाढ कोणाच्या बापाच्या हातात नाही, अशी टीका त्यांनी फडणवीसांवर केली आहे.

## इनामी व देवस्थानच्या जमिनी वर्ग एकच्या होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमधील या जमिनींबाबत विविध समस्या निर्माण झाल्या होत्या. याचा विचार करून या खालसा झालेल्या इनामी जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यासंदर्भात पुढाकार घेतला होता. या बैठकीस खासदार अशोक चव्हाण, सुरेश धस, राणा जगजितसिंह पाटील, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी आदी उपस्थित होते. मराठवाडा विभागात मोठ्या प्रमाणावर खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये आणण्याचा निर्णय राज्य ◀◀ पान २ वर

## आ.क्षीरसागरांकडून स्लीप रोडसाठी पाठपुरावा



**संभाजीनगर : मागील मोठ्या कालावधी पासून बीड शहरातील बाह्यवळण रस्त्यावर स्लिप रस्ता व शहरातील दोन्ही प्रमुख मार्गावर उड्डाणपूल तयार व्हावा यासाठी आ.संदीप क्षीरसागर पाठपुरावा करत आहेत. यासंदर्भात मंगळवारी (दि.३०) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक श्री. इंगोले यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी लवकरात लवकर काम सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम साहेब उपस्थित होते.**

## बीड शहराजवळील स्लीप रोडसह उड्डाणपुलाचा प्रश्न मार्गी लागणार

### डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश गडकरींच्या आदेशाने तांत्रिक शक्यता तपासण्याचे निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

सोलापूर–छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगतच्या स्लीप रोडसह महालक्ष्मी चौकात उड्डाणपुल बांधण्यासंदर्भातील तांत्रिक शक्यता तपासण्याचे निर्देश केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रस्तावाचा संदर्भ देत ना.नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाच्या तांत्रिक सल्लागारांनी महामार्ग प्राधिकरणाच्या प्रादेशिक अधिकार्यांना हे निर्देश दिले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसात हा विषय मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



सोलापूर–छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या बीडच्या वळण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपुल तयार केला तर हे अपघात टाळता येतील असे सांगत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भुपृष्ठ ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३० जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.०० क्विंटल | २,५०० | ३,००१ | २,७८४ |
| ज्वारी/हायब्रिड : ५०.०० क्विंटल | २,२०१ | ३,११२ | २,५७१ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ४.०० क्विंटल | ८,७०० | ८,७०० | ८,७०० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: ३८.५० क्विंटल | २,६०१ | २,८०१ | २,७१८ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ३.५० क्विंटल | ३,६०१ | ३,६०१ | ३,६०१ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,५०० | ६,४०१ | ६,०९७ |

# जीआर निघाला; ३ मोफत गॅस सिलेंडर मिळण्याचा मार्ग मोकळा

## मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना लागू: ५२.१६ लाख महिलांना लाभ

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील लाडक्या बहिणींसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आणखी एक मोठी घोषणा केली होती. आता या योजनेचा जीआर निघाला असून ही योजना अमलात आली आहे. मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेअंतर्गत महिलांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत मिळणार आहे. तर राज्यातील ५२.१६ लाख महिलांना याचा लाभ मिळणार आहे.**

राज्यातील लाडक्या बहिणींसाठी मुख्यमंत्री एकनाथ यांनी ◀◀ पान २ वर

### » योजनेची पात्रता आणि निकष काय?

या योजनेचा लाभ मिळण्यासाठी गॅस जोडणी महिलेच्या नावाने असणे आवश्यक आहे. राज्यातील प्रधानमंत्री उज्वला योजनेंतर्गत पात्र असलेले लाभार्थी या योजनेसाठी पात्र असणार आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस पात्र असलेल्या लाभार्थ्यांचे कुटुंब या योजनेस पात्र असणार आहे. एका कुटुंबात शिधापत्रिकेनुसार केवळ एक लाभार्थी या योजनेस पात्र असेल. तसेच फक्त १४.२ किलोग्रॅम वजनाच्या गॅस सिलेंडरची जोडणी असलेल्या गॅस ग्राहकांना ही योजना लागू असेल.



### » योजनेची कार्यपद्धती नेमकी काय?

प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना गॅस सिलिंडरचे नियमित वितरण हे तेल कंपन्यांमार्फत करण्यात येते. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजने अंतर्गत द्यावयाच्या ३ मोफत गॅस सिलिंडचे वितरणही तेल कंपन्यामार्फत करण्यात येईल. केंद्र सरकारच्या ३०० रुपये अनुदाना व्यतिरिक्त राज्य शासन ५३० रुपये प्रति सिलिंडर इतकी रक्कम लाभार्थ्यांचा थेट बँक खात्यात जमा करण्यात येईल. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थी यांना प्रति सिलिंडर ८३० रुपये रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे बँक खात्यात जमा करण्यात येईल. या योजनेत ग्राहकास एका महिन्यास एकापेक्षा जास्त सिलिंडरसाठी अनुदान देण्यात येणार नाही. दि.१ जुलै २०२४ रोजी पात्र होणाऱ्या लाभार्थ्यांनाच योजनेचा लाभ देण्यात येईल. दि.१ जुलै २०२४ नंतर विभक्त केलेल्या शिधापत्रिका या योजनेस पात्र ठरणार नाहीत.



cmyk

अग्रलेख

# जबाबदारीचे भान सगळ्यांनीच ठेवावे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (२८ जुलै) 'मन की बात' या आपल्या नियमित कार्यक्रमात जनतेला संबोधित करताना काही महत्त्वाच्या विषयांवर जनतेशी संवाद साधला. आपल्या भाषणात त्यांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. राजस्थानच्या 'कुल्हाडी बंद पंचायत' मोहिमेचा उल्लेख करताना जंगलतोड थांबवणे तसेच खादीचा प्रचार करण्यावरही भर दिला. जंगलतोडीचे दुष्परिणाम आता सर्वविदीत झाले आहेत तरीही झाडांची हत्या सुरूच आहे. ती थांबवायला हवी. यासाठी कोणीतरी पुढाकार घ्यायला हवा होता. राजस्थानच्या रणथंबोर येथून 'कुल्हाडी बंद पंचायत' मोहिमेची सुरुवात झाली आहे. रणथंबोरच्या आसपासच्या गावांतील स्थानिक समुदायाने जंगलात कुऱ्हाड न नेण्याची शपथ घेतली आहे. लोकांच्या या उपक्रमामुळे रणथंबोरची जंगले हिरवीगार झाली आहेत. झाडे आणि जंगले हा आपल्या देशाचा वारसा आहे. हा वारसा टिकून राहणे महत्त्वाचे आहे. जंगले हिरवीगार राहिली तर ताजी शुद्ध हवाही मिळते. 'हिरवे हिरवे गार गालीचे, हरित तृणांच्या मखमालीचे' हा नजाराच मनाला आल्हाददायक आहे; पण लक्षात कोण घेतो?

पर्यावरण सुधारणे ही आज काळाची गरज बनली आहे. जागतिक स्तरावर त्या संबंधीच्या चर्चा झडतात; परंतु पुढे काहीच घडत नाही. एकत्र जमले की मोठमोठ्या गप्पा मारल्या जातात नंतर 'पुन्हा ये रे माझ्या मागल्या' सुरू राहते. याचे दुष्परिणाम कोणत्या ना कोणत्या रुपाने मानव जातीला सहन करावे लागतात. जंगलतोड अशीच होत राहिली तर काहीच उरणार नाही. त्यासाठी झाडे न तोडण्याची आणि झाडे लावण्याची, त्याची निगा राखण्याची शपथ घ्यावी लागेल. हिरवाई बहरावी म्हणून अनेक संस्था कार्यरत आहेत; परंतु त्यांचे प्रयत्न तोकडे पडत आहेत. त्यासाठी सामुदायिक प्रयत्न महत्त्वाचे आहेत. जंगल हे जंगली श्वापदांचे निवासस्थान असते. त्यांना हुसकावून लावल्यास त्यांचा मानवी वसाहतीत प्रवेश होतो. अमुक वसाहतीत वाघ दिसला अशा बातम्या येऊ लागतात. 'टायगर अभी जिंदा है' या म्हणण्याला काही अर्थ नाही. त्याला खरोखरच 'जिंदा' ठेवायचे असेल तर त्याच्या निवासस्थानावरील अतिक्रमण रोखायला हवे. जंगले उद्ध्वस्त करून आपण त्याचे जगणे मुश्कील करून टाकले आहे. जंगलतोड थांबली तर 'टायगर जिंदा' राहण्यास चांगले वातावरण निर्माण होईल. या संदर्भात पंतप्रधानांनी उत्तर प्रदेशातील पिलीभीत येथील बाघ मित्र कार्यक्रमाचे कौतुक केले. वाघ आणि स्थानिक लोकांमध्ये संघर्ष होऊ नये यासाठी तेथे लोकांना प्रशिक्षण दिले जाते. आंध्र प्रदेशातील नल्लामलाई टेकड्यांवर राहणाऱ्या चेंचू जमातीचे प्रयत्नही वाखाणण्याजोगे आहेत. तेथे जंगलातील वन्य प्राण्यांची सर्व माहिती ट्रॅकरच्या स्वरूपात गोळा करण्यात आली असून वन्य प्राण्यांवर नजर ठेवली जाते. महाराष्ट्रातील ताडोबा व्याघ्र प्रकल्प हे वाघांचे माहेरघर आहे. इथे इको टुरिझमला चालना देण्यात आली आहे. 'मन की बात'मध्ये पंतप्रधान मोदींनी खादी ही आपली ओळख असल्याचे आणि जपण्याचे आवाहन केले.

खादीचा संबंध आपल्या देशाच्या संस्कृतीशी आहे. आपली ही संस्कृती आपणच जपायला हवी. आज परदेशातही खादीच्या कपड्यांना मागणी आहे. अहिंसा आणि खादी ही महात्मा गांधींनी देशाला दिलेली देणगी आहे. देशामध्ये खादी आणि हातमागावरील वस्त्रांची विक्री वाढत आहे त्यामुळे देशात रोजगाराच्या संधी वाढत आहेत. खादी ग्रामोद्योगाच्या व्यवसायाने प्रथमच १.५ लाख कोटींचा टप्पा ओलांडला आहे. आज खादीची विक्री ४०० टक्क्यांनी वाढली आहे. वाढत्या विक्रीमुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या नवीन संधी वाढत आहेत. या उद्योगात बहुसंख्य महिला असल्याने त्यांना सर्वाधिक फायदा होत आहे. जास्तीत जास्त रोजगार मिळत असल्याने त्या स्वावलंबी बनत आहेत. पूर्वी जे लोक खादी वापरण्यास तयार नव्हते ते आता अभिमानाने ही उत्पादने वापरत आहेत. आतापर्यंत खादीचे कपडे घेतले नसतील तर या वर्षापासून त्याची सुरुवात करा, असे आवाहन करण्यात आले. पंतप्रधानांनी महाराष्ट्राच्या 'पैठणी' आणि विदर्भाच्या 'हँड ब्लॉक प्रिंट'पासून ते ओडिशाच्या 'संबळपुरी साडी', मध्य प्रदेशच्या 'माहेश्वरी साडी', हिमाचलच्या 'भुट्टीको'ची शाल तसेच जम्मू-काश्मीरच्या 'कानी शाल'चा उल्लेख केला. याद्वारे महिलांप्रमाणे देशाच्या विविध भागांतील कारागीर हातमाग लोकप्रिय करण्यात व्यस्त आहेत. ७ ऑगस्ट रोजी 'राष्ट्रीय हातमाग दिवस' साजरा करण्याचे आवाहनही पंतप्रधानांनी केले. १५ ऑगस्टच्या निमित्ताने 'हर घर तिरंगा अभियान' राबवण्याचे आवाहन मोदींनी केले. लोकसभा निवडणुकीनंतरच्या 'मन की बात'च्या १११ व्या भागात पंतप्रधानांनी जनतेशी संवाद साधताना विविध मुद्यांवर भाष्य केले होते. निवडणुकीत ६५ कोटी लोकांनी मतदान केल्याबद्दल त्यांचे आभार मानले होते तसेच मोदींनी 'एक पेड माँ के नाम' अभियानाची घोषणा केली होती. ११२ व्या भागात पंतप्रधान मोदींनी स्वातंत्र्य दिनाच्या भाषणासाठी सूचना पाठवण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधान नेहमी 'मन की बात' करतात 'जन की बात' करीत नाहीत, असा विरोधकांचा आक्षेप असला तरी काही महत्वाचे मुद्दे या निमित्ताने समोर येतात हेही नसे थोडके.

# गुरूजी ज्ञान 'विज्ञाना'चे, घडविले आयुष्य अ'गणित' मुलांचे..!

सिंदफना शिक्षण प्रसारक मंडळ, माजलगाव परिवारातील आदरणीय गुरूवर्य श्री घनश्याम आप्पाराव मुंढे सर (पर्यवेक्षक, माध्यमिक विद्यालय, टाकरवन ) व श्री जगन्नाथ शंकरराव सरवदे सर (प्राचार्य तथा मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय, वडवणी) आज आपण शासनाने निर्धारित केलेल्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहात परंतु आपण केलेले अखंड ज्ञानदानाचे कार्य आपणास कधीच निवृत्त होऊ देणार नाही. कारण त्या पाठीमागे आपण केलेली कामगिरी ही फक्त एक शिक्षक म्हणून नव्हे तर उत्कृष्ट शिक्षक व पालकांची जी कर्तव्य आणि जबाबदारी असते ती आपण अगदी सार्थ आणि समर्थपणाने पार पाडलेली आहे. दिंद्रुड येथील माध्यमिक विद्यालयात मी इयत्ता आठवी ते दहावी पर्यंत शिकत असताना शैक्षणिक वर्ष १९९३ ते १९९६ या काळात विज्ञान विषय शिक्षक म्हणून श्री मुंढे सर व गणित विषय शिक्षक म्हणून श्री सरवदे सर यांचा सहवास आम्हाला लाभला त्यामुळेच माझ्यासारख्या अ'गणित' ग्रामीण विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञान-'विज्ञाना'चा सुगंध दरवळला. हे अगदी सुरूवातीलाच नम्रपणाने आणि स्वाभिमानाने नमूद करतो.





शिक्षक-विद्यार्थी यांचे नाते पूर्वीपासून ते आजच्या काळात आणि पुढेही तेवढेच महत्त्वाचे मानले पाहिजे. विद्यार्थी हे शिक्षकांचे अनुकरणीय असतात असे म्हटले जाते. यासाठी शिक्षकही तेवढेच आदर्शाचे दीपस्तंभ असायला हवेत, तेव्हाच त्यांच्या कार्य आणि कर्तृत्वाची ध्वजा जगभर फडकवली जाते. नाहीतर ती आतल्या आतच अडकवली जाते. अशाच प्रकारची उदात्त ध्येय, मूल्य घेऊन जगणारी व वागणारी शिक्षक असतील तर डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम म्हणतात त्याप्रमाणे एका दिव्याने असंख्य दिवे पेटवता येतात त्याचप्रमाणे एक शिक्षक असंख्य विद्यार्थ्यांना घडवीत असतो.

मी आठवीच्या वर्गात असतांना वर्गशिक्षक श्री मुंढे सर विज्ञानासह इंग्रजी विषयही शिकवत. त्यावेळी मला '' म्हणजे एकत्रितपणे या इंग्रजी शब्दांच्या अर्थासाठी मारलेली छडी ही माझ्या एकत्रित आयुष्याची घडी बसवणारी ठरली हे मला आज कळत आहे. मुंढे सरांकडे अभ्यासाच्या बाबतीत जेवढी कठोरता होती, त्यापेक्षा कितीतरी जास्त आंतरिक प्रेमळ हृदयाची विशालता असलेली दिसून येते. मी आठवीत असतांना एकदा बीड-परळी हायवे वरून मित्रासोबत सायकलवरून मागे डबलसीट बसून जातांना रोडवर पडलो, तेव्हा रक्तबंबाळ अवस्थेत शाळेत मित्रांसह आलो असता कोणताही क्षणाचा विलंब न लावता मला सतरंजीमध्ये टाकून दिंद्रुड गावातील डॉ.कापसे साहेबांकडे तातडीने घेऊन गेलात, परंतु डॉ. साहेबांनी माझी एकूण मरणासन्न अवस्था पाहून उपचारासाठी पुढे नेण्यासाठी सूचना केली, तेव्हा आपण अगदी तळमळीने व प्रचंड आत्मविश्वासाने सिरसाळा येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले. हा अंगावर शहारे आणणारा घटना प्रसंग मी कधीच विसरू शकत नाही. म्हणून सर आपण माझ्या आयुष्यातील देवदूत ठरलात म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. हे प्रेम,माया, आपुलकी आणि जिव्हाळा माझ्या सारख्या अनेक विद्यार्थ्यांप्रती आपण दिला. म्हणूनच मी आपल्या गतस्मृतीतील आठवणींना सेवानिवृत्तीच्या निमित्ताने पुन्हा उजाळा देत आहे. एवढेच नाही तर खेड्यातील लेकरांना विज्ञान सारख्या विषयात आवड निर्माण करून

माझ्या सारख्या अनेक विद्यार्थ्यांना अगदी आईच्या मायेने बुद्धीरूपी तेलाचा वापर करून, ज्ञानरूपी दिवा अखंड तेवत ठेवून त्यांच्या आयुष्याचे सोने केले. अशा शिक्षकांबद्दल स्वर्गीय आर.आर. (आबा) पाटील म्हणतात की, ''घडणारा तर असावाच लागतो, पण त्यांना घडविणारा कोणीतरी असावा लागतो.'' याची प्रचिती आपल्या विचार आणि आचरणातून आम्हाला मिळाली. एवढंच नाहीतर आजही आमच्याशी आपण मित्राप्रमाणे मनमोकळेपणाने संवाद साधतात तेव्हा इंग्रजी मधील या म्हणीची आठवण येते की, . महान शिक्षक हे विद्यार्थ्यांचे महान मित्र असतात. असे महान शिक्षक आम्हाला लाभले. याबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात की, ''गुरूजनी ऐसे द्यावेत धडे । आपुला आदर्श ठेवोनी पुढे। विद्यार्थी तयार होता चहुकडे। राष्ट्र होई तेजस्वी ।।'' अशाच प्रकारे अध्ययन-अध्यापनाचा ध्यास आणि भूमितीचा व्यास समजावून सांगणारे दुसरे महत्वाचे व्यासंगी गुरू म्हणजे श्री सरवदे सर होत. सरांची शारीरिक उंची कमी दिसत असली गणितातील अगणित सूत्रे व भूमितीची अनेक प्रमेय अगदी सहजगत्या विद्यार्थ्यांना सिद्ध करून देणारे सिद्धहस्त गणिततज्ञ आम्हाला हिमालयाएवढया उंचीचे वाटत. सरवदे सरांनी विद्यार्थ्यांच्या हतावर कधीच हळूहळू छडी मारली नाही कारण त्यांना विद्यार्थ्यांच्या हातून त्यांच्या आयुष्याची गणितं सोडवून घ्यायची होती. आमच्या सरांचा सर्वात मोठा आदर्श म्हणजे ते जसे ज्ञानाने, मनाने आणि धनानेही मोठे आहेत तसेच ते कोणत्याही व्यसनापासून आजही अबाधित आहेत. हे आजच्या तरूण पिढीला आवर्जून सांगितले पाहिजे. अशा गुरूजनांच्या कार्यांचा वसा आणि वारसा पुढे नेत असताना त्यांच्यातील साने गुरूजी आठवतात, ''माझ्या ओठावर थरथरे प्रार्थना हीच, माझ्या हातून कधी व्हावे कार्य नीच.'' तर कधी विंदा करंदीकरांचे शब्द गुणगुणावेसे वाटतात, ''देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे.'' सेवापूर्तीच्या गौरवकार्यास माझी ईच्छा असूनही उपस्थित राहू शकत नाही, परंतु शब्द पुष्पांची ही माला आपल्या सेवाकार्यासी कृतज्ञता पूर्वक समर्पित करून माझ्या वाणी व लेखणीला आवर घालतो. आणि पुढील सुखी, समाधानी आणि निरोगी आयुष्याच्या सदिच्छा व्यक्त करतो. धन्यवाद..!



प्रा.डॉ.चत्रभूज बालासाहेब कदम
महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड ता. वरूड जि.अमरावती. दूरभाष क्र.९४२१३४४०१३.

# पदोन्नतीसाठी आमरण उपोषण संघर्षमय अपरिहार्तता-अनिल जाधवर

बीड । प्रतिनिधी

निकष व अटींची पुर्तता करणाऱ्या कर्मचार्यांना प्रशासकिय विभागातुन पदोन्नती देण्यात यावी यासाठी उपोषण करण्यात आले संघर्ष करण्याची तयारी ठेवावी असे आवाहन शिक्षक संघटनेचे अनिल जाधवर यांनी केले.

शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक ग्रेड (प्रा) ही पदे पदोन्नतीने भरावीत. तीन वर्षापासून प्रलंबित असणारे निवडश्रेणी व चटोपाध्याय आदेश मंजूर करावेत. वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके सहा महिन्यापासुन प्रलंबित होती ती समितीने मंजूर करावीत या प्रमुख मागण्यासाठी शिक्षक पदोन्नती संघर्ष समन्वय समिती कडून दि. २४ जुलै रोजी जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण पार पडले. उपोषणा दिवशी सायंकाळी प्रशासनाकडून कांही मागण्या / प्रश्न पंधरा ऑगस्ट पूर्वी सोडवले जातील असे सांगितले व कालबद्ध वेळापत्रक लिखित स्वरुपात पदोन्नती संघर्ष समितीच्या नावे देण्यांत आले. त्यामध्ये प्रामुख्याने गणित/ विज्ञान विषयाची पदवीधरची पदे भरणे, मुख्याध्यापक पदाच्या पदोन्नती करणे, प्रलंबित वैद्यकीय संचिकांना मान्यता देणे या विषयी सोडवण्यासाठी / मंजूर करण्यासाठी शिक्षण विभागाने कार्यवाही सुरु केली. परंतु हे प्रश्न सोडवण्यासाठी विलंब करण्याचे कुठलेही कारण नव्हते . शिक्षण विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या दुर्लक्षित पणामुळे विलंब झाला हे निश्चित पणे म्हणता येईल. केंद्रप्रमुख पदोन्नती करण्याबाबत सर्वोच्च न्यायालय खंडपठ औरंगाबाद( संभाजीनगर ) यांनी न्यायालयीन अवमान याचिकेच्या आधारेआदेशित केले होते. दि. ६ फेब्रुवारी ते १५ जुलै पुर्वी केंद्रप्रमुख पदोन्नती करून आदेश निगमित केले जातील असे शपथपत्र जिल्हा परिषदकडून न्यायालयात दाखल केले होते. सदरिल कालावधीत जिल्हा परिषदेकडून केंद्रप्रमुख पदोन्नती करण्यात आल्या नाहीत. न्यायालयीन निर्णयाचा देखील अवमान करण्यात आला . या दरम्यान जून व जुलै महिन्यामध्ये निवृत्त होणाऱ्या शिक्षक व कर्मचार्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते हे ही प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले तरीसुद्धा प्रशासनाने विहित वेळेत केंद्रप्रमुख पदोनत्या केल्या नाहीत. अनेक शिक्षक पदोन्नती विना जून अखेर सेवानिवृत्त झाले. पदोन्नती पासुन वंचित राहिले. यास जबाबदार कोण या सर्व बाबींची अपरिहार्यता म्हणजे जिल्हा परिषदेसमोर शिक्षक पदोन्नती संघर्ष समितीचे आमरण उपोषण होय. आता तरी शिक्षण विभागाने १५ ऑगस्ट पुर्वी मुख्याध्यापक पदोन्नती, गणित विज्ञान पदवीधर पदे भरणे. निवडश्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करणे . प्रलंबित वैद्यकीय प्रस्ताव मंजूर करणे हे सर्व प्रश्न वेळेत सोडवावेत तसेच न्यायालयाच्य अधिन राहून केंद्रप्रमुख पदोन्नती कराव्यात. अन्यथा १५ ऑगस्ट २०२४ नंतर शिक्षकांच्या प्रश्नासाठी व पदोन्नतीसाठी आमरण उपोषण अपरिहार्य असे शिक्षक पदोन्नती संघर्ष समितीच्या वतीने प्रशासनाला इशारा दिलेला आहे. यावेळी कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ, कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, महाराट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, महाराष्ट्र शिक्षक संघटना, तसेच जिल्हयातील शेकडो शिक्षकसह अनिल जाधवर, राजेंद्र खेडकर, नामदेव शिंदे, प्रकाश अहिरे, सुरेश पवार, चंद्रकांत साबळे, भागवत डाके, भगवान पवार, मनियार फारुक सह आदी उपस्थित होते.



# पंकजा मुंडेंनी भाजपच्या चार जिल्ह्याच्या बैठका घेतल्या

लातूर । प्रतिनिधी

**भाजपच्या बैठकीतील मुद्द्यांवरही पंकजा मुंडे यांनी भाष्य केले आहे. लाडकी बहीण योजनेवर विरोधकांकडून होणाऱ्या टीकेलाही पंकजा मुंडेंनी उत्तर दिले आहे.**

नांदेड, धाराशिव, बीड आणि लातूर जिल्ह्यातील संघटनात्मक बैठक पार पडली. या बैठकीत माजी मुख्यमंत्री भाजप नेते खा. अशोक चव्हाण, माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर, माजी आ. सुरेश धस, भीमराव धोंडे, आर.टी. देशमुख, रमेश आडसकर, मोहन जगताप, बीड भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, सर्जेराव तांदळे, सलिम जहागिर यांच्यासह चारही तालुक्यातील खासदार, आमदार आणि २५० ते ३०० पदाधिकारी सहभागी झाले होते. या बैठका पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडल्या. भाजपच्या बैठकीतील मुद्द्यांवर पंकजा मुंडे बोलत्या झाल्या. अर्थसंकल्पात झालेल्या तरतुदी, बोगस मतदार नोंदणी रोखणे यावर मार्गदर्शन केले आहे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवर विरोधक टीका करत आहेत. याला पंकजा मुंडेंनी उत्तर दिले आहे. लाडकी बहीण योजनेवर विरोधक टीका करत आहेत. मात्र तेच




लोक त्याचा फॉर्म भरून घेण्यासाठी गडबड करत आहेत. लाडकी बहीण योजना अत्यंत चांगली असून महाराष्ट्रातील महिलांमध्ये चांगले वातावरण आहे, असे पंकजा मुंडे यांनी सांगितले आहे.

## पान १वरून...

### अमित शाह यांच्या भेटीसाठी

अजित पवारांनी असे केले. उद्या एखादा अतिरेकी हेच उदाहरण घेऊन असे कृत्य करेल. हा पूर्णपणे देशाच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. याबाबत मुंबई, दिल्ली विमानतळासह एअरलाईन्सची चौकशी झाली पाहिजे. एअरलाईन्सने ज्यांना ओळखत नाही त्यांना प्रवासाची परवानगी कशी दिली? आम्हालाही कार्ड दिले जाते. नागरी विमान वाहतूक मंत्रालयानेही याबाबत उत्तर दिले पाहिजे अशी मागणीही यावेळी केली. पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, उद्या एखादा अतिरेकी देशात आला तर त्याची जबाबदारी कोण घेणार? मुळात अजित पवार चोरून वेश बदलून अमित शहा यांना भेटायला का येत होते. त्यांच्यात असे नेमके काय शिजत होते? असा सवाल सुप्रियाताई सुळें यांनी केला आहे. विशेष म्हणजे अजित पवार त्यांच्यासोबत गेले त्याच्या केवळ पाच दिवसांपूर्वी पंतप्रधानांनी अजित पवारांवर आरोप केले. एकीकडे मोदी अजित पवारांवर आरोप करत होते आणि दुसरीकडे अजित पवार अमित शहा यांची भेट घेत होते. नेगोशिएट करत होते. मग ना खाऊंगा ना खाने दुंगा कुठे गेलं? हे वॉशिंग मशीन नाही का? सगळे म्हणतात भाजप म्हणजे भ्रष्ट जुमला पार्टी झाली आहे. आता देवेंद्र फडणवीस आणि मोदीच याचे उत्तर देतील, असा टोलाही यावेळी त्यानी लगावला.

-----------

### शेतकऱ्यांना चुचकारण्याचा

नेत्यांशी चर्चा करायला तयार असल्याचा दावा केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी केला आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी सरकारचे दरवाजे खुले असल्याचेही गोयल यांनी म्हटले आहे. विधानसभा निवडणुकांमध्ये शेतकऱ्यांची नाराजी ओढावू नये म्हणून त्यांना आता सरकारकडून चुचकारण्याचा प्रयत्न होत असल्याचे बोलले जात आहे. शेतकरी आंदोलनाबाबत गोयल म्हणाले की, शेतकऱ्यांच्या हिताच्या उपाययोजनांसाठी सरकार काम करत आहे. सरकार शेतकरी हितासाठी चर्चा करण्यास सदा तयार आहे. देशभरातील शेतकरी आनंदी असून मोदी सरकारला ते पाठिंबा देत आहेत. अन्यथा एवढा मोठा जनादेश घेऊन आम्ही परत सत्तेत येऊ शकलो नसतो. पण शेतकऱ्यांचा अतिशय छोटा गट तो असंतुष्ट असल्यावर गोयल यांनी भर दिला. तर यूपीएने आपल्या सरकारच्या १० वर्षात काय केले? मी त्यांच्या सरकारची १० भाषणे वाचली आहेत. हमीभाव कायदा आणण्याबाबत त्यांनी कधीही उल्लेख केला नाही. गरिबांच्या उन्नतीसाठी ते कधी बोलले नाहीत, असा आरोप गोयल यांनी कॉंग्रेसवर केला. हरियाणात विधानसभेच्या ९० जागा असून काहीच महिन्यात येथे विधानसभा निवडणूक होणार आहेत. याआधी येथे लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला जबर धक्का बसला आहे. या धक्क्याने सत्ताधारी भाजप घाबरली असून, सध्या अपक्ष आमदारांच्या बळावर सरकार चालवले जात आहे. तर आगामी निवडणुकीत लूट, प्रॉपर्टी आयडीत भ्रष्टाचार आणि फॅमिली आयडीच्या समस्यांसह शेतकरी आंदोलन असे महत्वाचे मुद्दे निवडणुकीच्या केंद्रस्थानी असतील. ज्यामुळे पुन्हा एकदा भाजपला नुकसानीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न सरकार करत आहे.

--------

### आरक्षणाच्या शिंदे समितीला

देण्यात आली असून ३१ डिसेंबरपर्यंतची ही मुदतवाढ आहे.

मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर राज्य सरकारने राज्यातील कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी जातीचा शोध घेऊन प्रमाणपत्र देण्याची पद्धत निश्चित करण्यासाठी शिंदे समिती स्थापन केली होती. राज्यातील मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या नोंदीसाठी आवश्यक पुराव्यांची तपासणी करणे आणि प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्याचे काम शिंदे समितीकडून सुरू आहे. या समितीकडून मराठा आरक्षणाबाबत कुणबी असल्याचे दाखले शोधण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी मराठवाड्यासह राज्यातील इतर भागांमध्ये समितीचे दौरे पार पडले आहेत. विविध ठिकाणचे दस्ताऐवज तपासून मराठा समाज हा कुणबी असल्याची नोंद तपासली जात आहे. दरम्यान, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भात या समितीने तेलंगणासह इतर राज्यात जाऊन अभ्यास केला आहे.

---------

### प्रकाश आंबेडकर-पंकजा मुंडे

मी लातूरकडे येत होते आणि ते कदाचित बीडकडे जात होते. त्यांना पाहिल्यानंतर मी त्यांना भेटून शुभेच्छा दिल्या. त्यांची यात्रा सुरू आहे. त्यामुळे त्यांना शुभेच्छा दिल्या. या भेटीमध्ये आमचा सहज आणि घरगुती संवाद होता, असं पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. राजकारणामध्ये वंचितांना, ज्यांचा आवाज कोणीच ऐकू शकत नाही. त्यांना शक्ती देण्यासाठी गोपीनाथ मुंडेसाहेब राजकारणात आले होते. मुंडेसाहेबांनी अशा लोकांना, समाजाला संधी दिली ते काम आम्ही पुढे करत राहू, असेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

------------

### पूजा खेडकरांना

तक्रार दिली होती. यानुसार हा गुन्हा दाखल झाला होता. युपीएससीने खेडकर यांची झालेली निवड रद्द करण्यासाठी आणि भविष्यात परीक्षा न देण्यासाठी कारणे दाखवा नोटीसही बजावली आहे. तपासातून असे उघड झाले आहे की, तिने पूजा खेडकर यांनी मर्यादेपेक्षा जास्त वेळा परीक्षा देऊन आयोगाची फसवणूक केली आहे. तसेच त्यांनी स्वत:चे नाव वडिलांचे आणि आईचे नावे, छायाचित्र/स्वाक्षरी, तिचा ईमेल आयडी, मोबाइल नंबर आणि पत्ता बदलून तिची ओळख खोटी दाखवून परीक्षेचे नियमांचे उल्लंघन केले असल्याचे यूपीएससीने आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले होते.

----------

### नोंदणी प्रक्रियेबाबत

सांगण्यात आले. संसदेने जे वित्त धोरण तयार केले आहे त्यामध्ये 'स्टेट बार कौन्सिल' (एसबीसी) आणि 'बार कौन्सिल ऑफ इंडिया' (बीसीआय) बदल करू शकत नाही किंवा सुधारणाही करू शकत नाही, असे न्यायालयाने नमूद केले. 'ॲडव्होकेट ॲक्ट- १९६१' अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करणारे बहुसंख्य घटक आहेत,' असे सांगतानाच सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी खुल्या श्रेणीतील पदवीधरांना वकील म्हणून नोंदणी करण्यासाठी ६५० आणि एससी तसेच एसटी प्रवर्गातील उमेदवारांना १२५ रुपयांपेक्षा अधिक शुल्क आकारले जाऊ नये असे म्हटले आहे. राज्य बार कौन्सिलकडून वकील म्हणून नोंदणी करण्यासाठी अवाजवी शुल्क आकारले जात असल्याचा आरोप करत काही वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले होते. याप्रकरणी न्यायालयामध्ये दहा याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. याबाबत याआधीही न्यायालयामध्ये सुनावणी झाली होती पण २२ एप्रिल रोजी याबाबतचा निकाल कोर्टाने राखून ठेवला होता. वकील कायद्यांतर्गत येणाऱ्या २४ व्या कलमात नोंदणीसाठी नेमके किती शुल्क आकारले जावे? याचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे पण अनेक बार कौन्सिल या नियमांचे पालन करत नसल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते.

----------

### मराठवाड्यातील इनामी व देवस्थानच्या

सरकारने घेतला आहे. यामुळे अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण होणार असून लाखो नागरिकांना दिलासा मिळणार आहे. या जमिनी मूळ मालकाला मिळणार आहेत. यासंबंधीचा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यामुळे ६० वर्षांपासून प्रलंबित प्रश्न निकाली निघणार आहे. मुख्यमंत्री असताना फडणवीस यांनी अशाच प्रकारचा निर्णय विदर्भासाठी घेतला होता आणि लाखो शेतकऱ्यांना कसत असलेल्या जमिनींचा मालकी हक्क मिळाला होता. मराठवाड्यात साधारणतः १३,८०३ हेक्टर इतक्या मदतमाश जमिनी आहेत. या मदतमाश इनाम जमीनीचे हस्तांतरण करण्यासाठी व परवानगीशिवाय झालेली हस्तांतरणे नियमित करुन सदर जमीनींचा दर्जा वर्ग-१ करण्यासाठी सन २०१५ मध्ये नजराण्याची ५० टक्के रक्कम शासनाने निश्चित केली होती. तथापि, ही रक्कम जास्त असल्याने हस्तांतरणे नियमित करण्यासाठी कमी प्रमाणात प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे नजराणा रक्कम कमी करण्याची मराठवाड्यातील अनेक लोकप्रतिनिंधीची मागणी होती. मंगळवारी झालेल्या बैठकीमध्ये मदतमाश जमिनीच्या हस्तांतरणासाठी नजुल जमिनींचे हस्तांतरण नियमित करण्याबाबत शासनाने यापूर्वी घेतलेल्या निर्णयाप्रमाणेच मदतमाश जमिनीच्या हस्तांतरणाकरिता बाजारमूल्य टक्के दराने नजराणा आकारण्यात यावा, याकरिता सदर प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर निर्णयार्थ ठेवण्यात यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. या १०० टक्के नजराणा रकमेवरील ४०% रक्कम देवस्थानच्या कायमस्वरुपी देखभालीकरिता देण्यात येणार असून २० टक्के रक्कम देवस्थानच्या अर्चकासाठी देण्यात येणार आहे तर उर्वरित ४० टक्के रक्कम शासनाकडे जमा करण्यात येईल. उपरोक्त दोन्ही निर्णयांमुळे मराठवाड्यातील सामान्य नागरिकांचा सुमारे ६० वर्षापासूनचा प्रलंबित असलेला जमीनींसंदर्भातील प्रश्न संपुष्टात येणार आहे.

**खिदमतमाश जमिनीच हस्तांतरण नियमित करणार**

मराठवाड्यात साधारणतः ४२,७१० हेक्टर इतकी खिदमतमाश जमीन आहे. या खिदमतमाश जमिनींवर देखील मोठया प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत. तसेच बेकायदेशीर बांधकामे देखील झालेली आहेत. त्यामुळे अशा जमिनीच्या हस्तांतरणाची तरतूद उपलब्ध करुन देण्याची गरज निर्माण झाली होती. यास्तव मराठवाड्यातील खिदमतमाश इनाम जमिनीचे हस्तांतरणासाठी १०० टक्के दराने नजराणा आकारण्यात येऊन हस्तांतरण नियमित करण्यात यावे, याकरिता यथायोग्य प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळासमोर निर्णयार्थ ठेवण्यात यावा, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**५५ हजार हेक्टर जमिनी खुल्या होणार**

सदर निर्णयामुळे मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांमध्ये जवळपास ५५ हजार हेक्टर जमिनी खुल्या होणार आहेत.

---------

### बीड शहराजवळील स्लीप रोडसह

वाहतूक मंत्रालयाकडे प्रस्ताव दिला होता. यात महालक्ष्मी चौकातील उड्डाणपुलासोबतच तेलगाव आणि पिंपळनेर रस्त्यावरील स्लिप रोडची देखील मागणी करण्यात आली होती. या पत्रांचा संदर्भ देत आता भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाचे तांत्रिक सल्लागार बाळासाहेब ठेंग यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नागपूर येथील प्रादेशिक अधिकार्यांना पत्र लिहिले आहे. यात उड्डाणपुल आणि स्लिप रोड संदर्भातील तांत्रिक शक्यता तपासून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, हा प्रश्न राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सतत लावून धरला. अलीकडे लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान माजलगाव येथे जाहीर सभेत हा प्रश्न मार्गी लावण्याची घोषणा ना.नितीन गडकरी यांनी केली होती. त्यानुसार विभागाकडून पाऊले उचलली जात आहेत.

**ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडेंसह आ.पंकजाताई मुंडेंच्या शिफारशीमुळे यश**

परळी येथे शासन आपल्या दारी कार्यक्रमात आलेले उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे बीड शहराजवळील उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली होती. त्या मागणीच्या अनुषंगाने दोघांनीही रस्ते, वाहतूक व दळणवळण विभागाकडे शिफारस केली होती. तसेच, आ.पंकजाताई मुंडे यांनी हा प्रलंबित प्रश्न ना.नितीन गडकरींच्या कानावर घातला. उड्डाणपूल, स्लिप रोडसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळत आहे.

--------------

**जीआर निघाला; ३ मोफत गॅस**

आणखी एक मोठी घोषणा केली आहे. राज्यातील महिलांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत मिळणार असल्याचा जीआर आज राज्य सरकारने प्रसिद्ध केला आहे. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या राज्यातील सुमारे ५२.१६ लाख लाभार्थ्यांना, तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबाना वर्षाला ३ गॅस सिलिंडरचे पुनर्भरण मोफत उपलब्ध करून देणारी, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ३१ जुलै २०२४



## आम आदमी पार्टीचे संघटनमंत्री महाराष्ट्र संग्राम घाडगे आज बीडमध्ये

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील येणाऱ्या विधानसभेच्या अनुषंगाने महाराष्ट्रामधील २८८ जागा आम आ आम आदमी पार्टी स्वबळावर लढवणार आहे याचा आढावा घेण्यासाठीआम आदमी पार्टीचे महाराष्ट्राचे



राज्यसचिव मा. संग्राम घाडगे पाटील हे ३१ जुलै रोजी शासकीय विश्रामगृह येथे आम आदमी पार्टी जिल्ह्यातील सर्व सहा विधानसभेच्या कार्यकर्त्यांशी संवाद इच्छुक उमेदवार यांची मुलाखत करतील यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांचा प्रवेश मोठ्या प्रमाणात पार्टी प्रवेश होणार आहे तरी बुधवार दिनांक ३१ जुलै रोजी सकाळी ११.००वा. पत्रकार परिषद दुपारी ०१.०० कार्यकर्त्यांशी संवाद व आढावा घेतला जाईल या बैठकीसाठी जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते पदाधिकारी व इच्छुक उमेदवारांनी उपस्थित माजी सैनिक अशोक येडे जिल्हा अध्यक्ष आम आदमी पार्टी यांच्या आदेशाने सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे व तेथून पुढील कार्यक्रम हा त्यांच्या इच्छेनुसार असेल.

# डोईफोडवाडी-निवडूंगवाडी ग्रामपंचायतचा मनमानी कारभार

## ग्रामरोजगार सेवक असताना सहाय्यकाची नियुक्ती कशासाठी? ग्रामरोजगारात सेवकाचे तीन वर्षाचे मानधनही दिले नाही

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत ग्राम रोजगार सेवकांची नियुक्ती दहा वर्षांपूर्वी झाली होती. असे असतानाही ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे अंबादास डोईफोडे यांना बाजूला करून एका दुय्यम ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती नियमबाह्य असतानाही याची वरीष्ठाकडून दखल घेण्यात आली नाही. अनेक वेळा अंबादास डोईफोडे यांनी पत्रव्यवहार केल्यानंतर वरिष्ठांनी ही नियुक्ती रद्द करून अंबादास डोईफोडे यांचे चार वर्षाचे मानधन द्यावे असे ग्रामपंचायतीला कळवूनही ग्रामपंचायत ने वरिष्ठांचे आदेश डावलून हे मानधन दिले नाही त्यामुळे ग्राम रोजगार सेवक अंबादास डोईफोडे यांनी बीड पंचायत समिती समोर कुटुंबासह अमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे .

डोईफोडवाडी- निवडुंगवाडी ग्रामपंचायत अंतर्गत दहा वर्षांपूर्वी अंबादास अभिमान डोईफोडे यांची ग्रामरोजगार सेवक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती .मात्र वैयक्तिक आकसापोटी अंबादास डोईफोडे कार्यरत असतानाही दुय्यम ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती नियमबाह्य करण्यात आली. याशिवाय अंबादास डोईफोडे यांचे मानधनही देण्यात आले नाही. वास्तविक पाहता हे मानधन ग्रामपंचायत च्या खात्यावर जमा आहे .मात्र पदाधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे शासनाने मानधन देऊनही हे मानधन संबंधितांना अद्याप मिळालेले नाही. अंबादास अभिमान डोईफोडे या ग्रामरोजगार सेवकांने उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि गटविकास अधिकाऱ्यांना अनेक वेळा कळवूनही त्यांनी केवळ पत्र व्यवहार केला या पलीकडे कसलीही कारवाई केली नाही .त्यामुळे ग्रामपंचायत ची मनमानी वाढली गेल्या अनेक दिवसापासून अंबादास डोईफोडे कार्यरत असतानाही केवळ राजकीय आकसापोटी ग्रामपंचायतीने दुय्यम ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती केली वास्तविक पाहता शंभर दिवसापेक्षा अधिक काम असेल तर दुय्यम ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती एक वर्षासाठी करण्यात येते. तशी परिस्थिती नसतानाही जाणीवपूर्वक दुय्यम ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती करण्यात आली. जी नियमबाह्य आहे यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि गटविकास अधिकाऱ्यांनी अनेक वेळा ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांना कळवूनही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले . अंबादास डोईफोडे यांचे गेल्या चार वर्षाचे मानधन जवळपास ५२ हजार रुपये ग्रामपंचायतीकडे थकीत असून केवळ आकसापोटी हे मानधन दिले जात नाही. येथे आठ दिवसात हे मानधन ग्रामपंचायतीने दिले नाही तर आपण पंचायत समिती समोर कुटुंबासह बेमुदत उपोषण करणार असल्याचे अंबादास अभिमान डोईफोडे यांनी सांगितले. केवळ राजकारण म्हणून एखाद्या व्यक्तीला पदावरून डावलने हे कायद्याला धरून नाही तर ही मनमानी आहे. जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सांगत असतानाही त्यांच्या पत्राला केराची टोपली दाखवली जाते. ही ग्रामपंचायतची मुजोरी संपवण्यासाठी अंबादास डोईफोडे यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

# गेवराई तालुका सरपंच संघटनेची स्थापना

### अध्यक्ष कालिदास नवले, उपाध्यक्ष शितल साखरे तर सचिवपदी भास्कर हातागळे यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील सर्व सरपंचांनाना सतत येणाऱ्या अडीअडचणी जाणीवपूर्वक होणाऱ्या तक्रारी, चौकशा यावर आळा बसवण्यासाठी व सरपंचाच्या विविध प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी गेवराई तालुका सरपंच संघटनेची स्थापना करण्यात आली आसून यामध्ये अध्यक्षपदी कालिदास नवले, उपाध्यक्ष शितल साखरे, तर सचिवपदी भास्कर हातागळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सोमवार दि.२९ रोजी पंचायत समिती सभागृहात झालेल्या बैठकीत ही या सरपंच संघटनेची स्थापना करून कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या बैठकीत तालुक्यातील सर्वच




ग्रामपंचायतीच्या सरपंच यांना काम करताना अनेक अडचणी येत आहेत. यामध्ये प्रशासकीय स्तरावर होणारी अडवणूक, राजकीय द्वेषातून गावपातळीवर होणाऱ्या तक्रारी या तक्रारीतून लाभार्त्यावर होणारा अन्याय यासह अनेक अडचणींचा सामना गावचा प्रमुख असलेल्या सरपंचांना करावा लागत आहे. यासाठी संघटनात्मक बांधणी करून या अडचणी सोडवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज लक्षात घेता या संघटनेची स्थापना केली. यामध्ये सर्वानुमते तालुकाध्यक्षपदी कालिदास नवले, उपाध्यक्षपदी शितल साखरे, सचिवपदी भास्कर हातागळे, कायदेविषयक सल्लागार म्हणून ॲड.नारायण शिंदे तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून पत्रकार भागवत जाधव यांची निवड करण्यात आली. तर सदस्य म्हणून निर्मला संभाजी आहेर, सोमित्रा आसाराम कबले, गोपीनाथ फलके, रितेश साबळे, नीता अंगद मैंद, पांडुरंग पवार, प्रल्हाद गायकवाड, रत्नमाला संतोष लाखे, योगेश रामभाऊ गाडे, वंदना शाम मुळे, बंडू नाना पवार, अरुणा नवले, श्रीराम उबाळे, ज्ञानेश्वर जाधव यांच्यासह आदींच्या निवडी करण्यात आल्या. ही संघटना कुठल्याही राजकीय पक्षाशी बांधील नसून यामध्ये सर्व पक्षीय सर्वच सरपंच सहभागी झाले आहेत. यावेळी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. दरम्यान यापुढे कुठल्याही सरपंचावर अन्याय झाला असेल तर सर्वांनी एकत्र येऊन त्यांच्या पाठीशी ही संघटना खंबीरपणे उभा राहील असा विश्वास तालुकाध्यक्ष कालिदास नवले यांनी व्यक्त केला.

# 'चला थोडंसं वाचूया' व्हाट्सअप ग्रुपकडून आदर्श वृक्षारोपण

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी जून महिन्यात पर्यावरणावर लिहिलेला 'आला जून चा महिना, झाडे लावा-झाडे जगवा' हा लेख वाचून 'चला थोडंसं वाचूया' व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातून साधारण दिड महिन्यापूर्वी साहित्यिक, कवी अनंत सुतनासे यांनी वर्गणीतून वृक्षारोपण करण्याचे सुचविले होते. यानंतर ग्रुप ॲडमिन एस.एम.युसूफ़ यांनी ग्रुपमध्ये आवाहन केले. त्याला ग्रुपमधील २९ सदस्यांनी पाठींबा देत वर्गणीतून ६३६५ रुपये जमा केले. यातून चांगली ८ ते १२ फूट उंच झाडांची १५ रोपे खरेदी करण्यात आली. याशिवाय माती आणि पाणीही खरेदी करून टाकण्यात आले. विशेष म्हणजे कुठलाही गाजावाजा न करता, फटाके न फोडता, हारतुरे न घेता, राजकारण्यांची मांदियाळी न जमविता, कार्यकर्त्यांचा घोळका न बोलवता अगदी साध्यापणाने 'चला थोडंसं वाचूया' व्हाट्सअप ग्रुपकडून



### अवघ्या ६ हजारात ८ ते १२ फुटी १५ झाडे लावली

दिनांक २९ जुलै २०२४ सोमवार रोजी जुने एस.पी. ऑफिस आणि जिल्हा रुग्णालय रस्त्यावर आदर्श वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे, अनंत सूतनासे, एस.एम.युसूफ़ आणि शीलवंत बाळूभाऊ यांचा सक्रिय सहभाग होता. तर वृक्षारोपणासाठी शेख मज़हरुद्दीन, फैय्याज़ इनामदार, सरफराज़ चौधरी, अनंत सूतनासे, अब्दुल कलाम, ए-१ सायकल, मुस्तफा पठाण, काज़ी मतीन, काज़ी मुनीर, साजिद सलीम, चाँद बेग, शकील बागवान, आबेद पठाण, शेख मोहसीन, ज़फर खान, बबलू पठाण, संतोष बनकर, मुख्याध्यापक महादेव चव्हाण, डब्बू अली (उत्तर प्रदेश), रमेशराव गंगाधरे, शेख सईद, एस.एम.युसूफ़, डॉ. भारती नंदगोली, गोविंदराव सवासे, सफ़र खान, अल्हाज सय्यद लायक़, शेख सलीम, इफ़्तेक़ार तंबोली, अल्ताफ़ शेख (पुणे) या २९ ग्रुप सदस्यांनी वर्गणीतून ६३६५ रुपये जमवत आदर्श वृक्षारोपण केले. यावेळी बोलताना मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ म्हणाले एका सर्वेक्षणानुसार आपल्या भारत देशात जनसंख्येच्या मानाने ५०० हजार कोटी झाडांची कमतरता आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या नागरी वसाहती निर्माण करण्यासाठी आणि रस्ते रूंदीकरणासाठी सर्रासपणे झाडांची कत्तल केली जात आहे. यामुळे ग्लोबल वॉर्मिंगचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. आपल्याला शुद्ध हवा (ऑक्सिजन) मुबलक प्रमाणात भेटावा याकरिता झाडांची लागवड होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक व्यक्तीने किमान एक झाड तरी लावणे आवश्यक आहे. ज्यामुळे पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास थांबेल.

# बीड जिल्ह्यात मनसे विधानसभा निवडणुक ताकदीने लढविणार - श्रीराम बादाडे

वडवणी । प्रतिनिधी

मा. हिदुजननायक राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार विधानसभा निरीक्षक मा. नगरसेवक सलीम मामा शेख, तसेच तांबोळी साहेब हे दि ३०/०७/२०२४ , व ३१/०७/२०२४ वार मंगळवार , बुधवार रोजी बीड जिल्ह्यातील गेवराई, बीड, आष्टी, पाटोदा शिरूर, केज, परळी, माजलगाव विधानसभा मतदारसंघ येथे येऊन विधानसभा निहाय इच्छुक उमेदवार यांच्या मुलाखाती घेऊन अहवाल मा हिदुजननायक राजसाहेब ठाकरे यांना सादर केला जाणार आहेत तरी मनसे पदाधिकारी, कार्यकर्ते, इच्छुक उमेदवारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मनसे जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे पाटील यांनी केले आहे.

**विधानसभा निरिक्षक यांच्या उपस्थितीत इच्छुकांच्या मुलाखती होणार**

महाराष्ट्र राज्यातील आगामी काही महिन्यांत होणारे विधानसभा निवडणुकीत राजसाहेब ठाकरे हे संपूर्ण विधानसभा मतदारसंघात मनसेचे उमेदवार देऊन ताकदीने निवडणूक लढविणार आहेत यासाठी राजसाहेब ठाकरे यांनी प्रत्येक जिल्ह्यात विधानसभा निरिक्षक यांच्या नियुक्ती करण्यात आलेल्या असुन बीड जिल्ह्यासाठी निरिक्षक म्हणून मा.नगरसेवक सलीम मामा शेख, तसेच तांबोळी साहेब यांच्या उपस्थितीत दि.३० व ३१ जुलै रोजी बीड जिल्ह्यातील गेवराई, बीड,आष्टी पाटोदा शिरूर,केज, परळी, माजलगाव,या सहा हि विधानसभा मतदारसंघ निहाय निवडणूकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार असून तसेच विधानसभा निहाय सविस्तर चर्चा होणार आहे व याचा सर्व अहवाल निरिक्षक हे राजसाहेब ठाकरे यांच्या कडे सादर करणार आहेत.तरी बीड जिल्ह्यातील सहा हि विधानसभा निवडणुकीत मनसे उमेदवार देऊन ताकदीने निवडणूक लढविणार आहे.तरी या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती मेळाव्यासाठी बीड जिल्ह्यातील मनसे पदाधिकारी, कार्यकर्ते, इच्छुक उमेदवारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मनसे बीड जिल्हा अध्यक्ष श्रीराम बादाडे यांनी केले आहे.

## उपकार्यकारी अभियंता प्रवीण दीक्षित औष्णिक विद्युत केंद्रातून आज होणार सेवानिवृत्त

परळी । प्रतिनिधी

येथील परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात उपकार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असणारे प्रवीण बसंतप्रसाद दीक्षित ३३ वर्षाच्या सेवेनंतर दि ३१ जुलै २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

प्रवीण बसंतप्रसाद दीक्षित हे परळी वीज निर्मिती केंद्रात कनिष्ठ अभियंता म्हणून रुजू झाले होते. सध्या त्यांच्याकडे माहिती अधिकार विभाग होता. धारूर तालुक्यातील असलेले दीक्षित दि २० जुलै १९९१ रोजी वीज निर्मिती केंद्रात नोकरीला लागले. त्यांनी आतापर्यंत संच क्रमांक एक ते आठ मध्ये तसेच चंद्रपूर वीज निर्मिती केंद्रातही जलसंधारण विभाग ,बाष्पक विभाग, कोळसा हाताळणी, राख हाताळणी ,तसेच संचलन सेवा, माहिती अधिकार विभाग आदी ठिकाणी उत्कृष्टरित्या काम केले आहे. दि ३१ जुलै २०२४ रोजी परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासकीय इमारतीत त्यांचा व इतर कर्मचाऱ्यांचा मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांच्या हस्ते सत्कार होणार आहे. त्यांनी त्यांचे काम करून इतर वेळात प्रशाकीय इमारती समोरील जिजाऊ उद्यानाची देखील देखभाल केली. त्यांचा मनमिळाऊ स्वभाव असल्याने ते प्रत्येकाच्या स्मरणात कायम राहतील. सेवानिवृत्तीनंतरही भविष्यात त्यांना आरोग्यमय व सुख समाधानाचे जीवन मिळावे असी मंगल कामना करण्यात येत आहेत सदिच्छा देण्यात येत आहेत. दीक्षित यांना एक मुलगा व एक मुलगी आहे.मुलगा साहिल हा बी.ई.एम.टेक.उत्तीर्ण असून सध्या तो हैदराबाद येथे कार्यरत आहे. तसेच मुलगी एम.टेक.झाली असून मुंबई येथे कार्यरत आहे.

# दिंद्रुड येथील श्रीसंत सावता महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे श्री संतश्रेष्ठ शिरोमणी सावता महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहास काल रविवारी (दि.२८) प्रारंभ झाला असून, दिंद्रुड सह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी सप्ताहातील सात दिवस हरिकीर्तन व विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थांनी केले आहे.

श्री संतश्रेष्ठ शिरोमणी सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त दिंद्रुड येथील संत सावता महाराज मंदिरात यावर्षी अखंड हरिनाम सप्ताहाला काल रविवारी प्रारंभ करण्यात आला आहे. पहाटे ४ ते ६ काकडा आरती व भजन, ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, श्री संत सावता महाराज चरित्र, दुपारी २ ते ५ रामकथा, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकीर्तन व त्यानंतर जागर असे कार्यक्रम होणार आहेत. या



सप्ताहात रविवार दि.२८ जुलै रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज हारकळ यांचे हरि किर्तन संपन्न झाले असून, दि.२९ रोजी ह.भ.प. नागनाथ महाराज पारेकर, दि ३० ह.भ.प. रोहिणी ठोंबरे, दि.३१ ह.भ.प. विष्णु महाराज रासवे, दि ०१ रोजी ह.भ.प. बाबासाहेब महाराज मुंडे, दि ०२ रोजी मारोती महाराज सुरवसे यांचे हरि किर्तन होणार आहेत. तर सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त दि.०३ ऑगस्ट शनिवार रोजी उध्दव महाराज ठोंबरे यांचे काल्याचे किर्तन किर्तन होणार आहे.

हभप हारकळ महाराजांनी आपल्या कीर्तनातून संत सावता महाराजांच्या जीवन चरित्राचा आढावा घेतला आणि जगद्गुरु तुकोबारायांच्या सदा नाम घोष करू हरी कथा, तेनु सदा चित्ति समाधान या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगातील पंक्ती प्रमाणे सविस्तर सारांश श्रवण करताना समोर मांडला. यावेळी मृदंगाचार्य चंद्रकांत महाराज जोशी, गायनाचार्य नाथ महाराज जाधव यांच्या सह गावातील सर्व व परिसरातील भजनी मंडळींनी त्यांना साथ दिली. येथील संत सावता महाराज मंदिरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन समस्त गावकऱ्यांनी केले असून, गावातील व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकारी यांना निर्णय देण्यास विलंब केल्याने उच्च न्यायालयाने १०१रु. ठोठावला दंड

मंठा । प्रतिनिधी

सुनावणी होऊन सहा महिने उलटले असले तरी राखीव ठेवलेला निर्णय देण्यास विलंब करणे जालना जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांना चांगलेच महागात पडले असून मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी १०१ रु.दंड भरण्याचे आदेश दिले असल्याने निर्णय थांबवणे विषयी जिल्हाभरात उलट सुलट चर्चा होत आहे. याविषयी सविस्तर वृत्त असे की, पांगरी खुर्द ता मंठा येथील शेतकरी नारायण पांडुरंग काळे यांनी दाखल केलेल्या याचिकेनुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ७ आणि ३६ अंतर्गत मा.जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे तक्रार केली होती.या ग्रामसभा न घेणे,मासिक सभा न घेता सभा नोटीस वर ग्रामपंचायत सदस्यांच्या परस्पर सह्या करने, ग्रामपंचायत ठरव बुक वर ग्रामपंचायत सदस्यांच्या माघारी खोट्या सह्या करणे या व इतर कारणांन विषयी काळे यांनी तक्रार केली होती.सदरील प्रकरणी जालना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने सुनावणी घेण्यात येऊन सदरील प्रकरणी ३० जून रोजी निकाल राखीव ठेवण्यात आला होता.त्या नंतर नारायण काळे यांनी वेळोवेळी निर्णय देण्यात येऊन निर्णयाची प्रत मिळावी यासाठी ३० जानेवारी २०२४ ते २८ जून २०२४ या कालावधीत पाच निवेदन दिली.२७ जून २०२४ रोजी रोजनाम्याची प्रतची मागणी केली. याचिकाकर्ते काळे हे निर्णयाची प्रत घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात गेले असता त्यांना कुठल्याही प्रकारची कागदपत्रे देण्यात आली नाही. त्यामुळे निराशेने व हताश होऊन शेतकरी नारायण काळे यांनी मा. उच्च न्यायालयात धाव घेऊन मा. हायकोर्टाचे विधीतज्ञ अँड प्रशांत गोपाळराव बोराडे यांच्या मार्फत न्यायालयात जालना जिल्हाधिकारी यांच्या विरोधात दाद मागितली.सदरील प्रकरणात अँड बोराडे यांनी पुराव्यासह जोरदार युक्तिवाद करून न्यायसाठी वाट पाहत असलेल्या काळे यांना न्याय मिळण्याची मा.न्यायालयाला विनंती केली.व परत सामान्य नागरिकावर, शेतकऱ्यावर अशा प्रकारचे अन्याय होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी यांना दंड ठोकण्याची मागणी केली.त्या वरून जालना जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांना १०१रु. दंड सुनावण्यात आला आहे.

# अंबड आगारात प्रवासी राजा व कामगार पालक दिन साजरा व बसस्थानक समस्यांबाबत निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र रा.प.महामंडळाच्या धोरणांतर्गत २९ जुलै सोमवार रोजी अंबड आगारात प्रवासी राजा व कामगार पालक दिनाचे आयोजन करण्यात आले होते.त्यानुसार ग्राम विकास युवा मंच च्या वतीने कुंभार पिंपळगाव येथील बसस्थानकावरील समस्यांबाबत निवेदन देण्यात आले . यावेळी प्रमुख समस्या सोडण्यात यावे अशी मागणी करण्यात आली या खालील प्रमाणे तातडीने समस्या सोडवण्याची मागणी रा.प.महामंडळा डीसी प्रमोद घुले यांच्याकडे करण्यात आली कुंभार पिंपळगाव बसस्थानक येथे वाहतूक नियंत्रक अधिकारी हे उन्हाळी व दिवाळी सुट्टीत येत नसल्याने त्यांची कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात यावी.

बसस्थानक येथे सफाई कामगार व वॉचमन गार्ड यांची कायमस्वरुपी नियुक्ती करण्यात यावी. कुंभार पिंपळगाव येथे दर बुधवारी आठवडी बाजार असल्याने संबंधित चालक वाहक हे वाहतूकीला रहदारी ची अडचण सांगुन एसटी बस बसस्थानकात न आणता एक कि.मी.लांब असलेल्या अंबड- पाथरी टि पॉइंट वरुन वळवल्या जातात.त्यामुळे प्रवाशांना नाहक एक कि.मी.टि पॉइंट ते बसस्थानक पायपीट करावी लागते.त्यामुळे संबंधित चालक वाहक यांना सक्त




आदेश देवुन दर बुधवारी सर्व एसटी बस या कुंभार पिंपळगाव बसस्थानक येथे आणण्यासाठी सांगण्यात यावेत. बसस्थानक परिसरात सि.सि.टिव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. बसस्थानक येथे प्रवाशांना एसटी बस सेवेच्या शासनाच्या विविध प्रकारच्या सोयी सुविधा योजनांची माहिती मिळावी यासाठी माईक व एल सि डी टि व्ही ची व्यवस्था करण्यात यावी. बसस्थानक परिसरात पथदिवे बसविण्यात यावेत. बसस्थानक परिसरात लोकसहभागातून वृक्षारोपण करण्यात येणार असून वृक्षांचे मोकाट जनावरे पासून संरक्षण व्हावे साठी बसस्थानक परिसरात संपूर्ण जाळी बसवण्यात यावी. बसस्थानक येथील अर्धवट असलेले नाली चे बांधकाम पुर्ण करण्यात यावेत. बसस्थानक येथे प्रवाशांना सुलभ सौचालय ची व्यवस्था करण्यात यावी.तसेच बसस्थानक परिसरात संपुर्ण डांबरीकरण करण्यात यावेत.कुंभार पिंपळगाव बसस्थानक येथुन कुंभार पिंपळगाव ते अंबड जाणे- येणे साठी दर एक ते दोन तासांनी अंबड आगाराची अंबड - कुंभार पिंपळगाव एसटी बस सेवा सुरु आहेत. ईतर आगारा पैकी परतुर आगाराची केवळ परतुर - गेवराई हि दिवसभरात एकमेव एसटी बससेवा सुरू आहे.ईतर कुठल्याही आगाराच्या बसेस या मार्गाने जात नाहीत.फक्त अंबड आगाराची गुंज- छत्रपती संभाजीनगर, धामणगाव- छत्रपती संभाजीनगर, अंबड- परभणी या दिवसभरात लांब पल्ल्याच्या केवळ तीन एसटी बससेवा सुरू आहेत.दिवसभरात इतर मार्गावर जाणे व येण्यासाठी एसटी बससेवा नाही.

बसस्थानक येथुन प्रवाशांना इतर लांब ठिकाणी जाणे व येण्यासाठी इतर आगाराच्या लांब पल्ल्याच्या एसटी बससेवा या भागात सुरू करण्यासाठी संबंधित विभागांना पत्र देण्यात यावी.

या निवेदन संदर्भात महामंडळाचे अधिकारी यांनी समस्या जाणून घेऊन त्याबाबत तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.या प्रसंगी जालना रा.प.महामंडळाचे डीसी प्रल्हाद घुले , दिगंबर जाधव विभाग वाहतूक अधिकारी, सुरेंद्र तांदळे यंत्र अभियंता, प्रदीप जोशी स्थापत्य अभियंता, रणवीर कोळपे आगार व्यवस्थापक यावेळी यांची उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### तीन कोटीचा मुद्देमाल जप्त

छापा टाकला असता. वाळू ची तस्करी करणे कामी आलेले सात हायवा पकडण्यात यश आले. सदरचे हायवा हे पोलीस संरक्षणात एसटी स्टँड गेवराई येथे लावून पुढील दंडात्मक कारवाई कामी तहसील कार्यालय गेवराई यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले.

सदरची कारवाई ही माननीय पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, उपवागीय पोलीस अधिकारी गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एक शिंगे, गेवराई तहसील चे तहसीलदार संदीप खोमणे साहेब तसेच टीम, पोलीस उपनिरीक्षक तांगडे, पोलीस हवालदार येळे, पोलीस शिपाई घोंगडे, पोलीस शिपाई सुरवसे, तसेच चालक गरजे आदींनी केली.

### आष्टीत बनावट मतदार नाव नोंदणी

नावे समाविष्ट करण्याचे काम सुरू आहे . नांव नोंदणी करणारे बी. एल. ओ. यांनी अशाप्रकारे संशयास्पद वाटणाऱ्या मतदारांची तसेच ज्या संशयित मतदारांनी ऑनलाईन मतदार नाव नोंदणी केली आहे त्यांची कागदपत्रे संबंधित बी. एल. ओ. यांनी खात्री करून घ्यावी व नांव नोंदणी करावी. तसेच बी. एल. ओ. यांनी यामध्ये काही चुकीची कामे केल्यास त्यांच्यावर देखील कडक कारवाई करण्यात यावी . बोगस मतदार नोंदणी बाबत उच्च न्यायालयात एक जनहित याचिकाही प्रलंबित असून , तक्रारीच्या प्रती माहितीसाठी तहसीलदार आष्टी / प्रांताधिकारी पाटोदा यांना देण्यात आली असल्याचे प्रसिद्धीस दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात सांगितले आहे .

cmyk

# कोल्हापुरातील पिके पाण्यातच

## सुमारे २५ हजार हेक्टर शेती पुरात बुडाली, सर्वाधिक फटका ऊस पिकाला

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यातील नद्यांचे पाणी कुर्मगतीने ओसरत आहे. गेल्या आठ ते दहा दिवसांपासून जिल्ह्यातील बहुतांशी शेती ही पाण्याखाली असून नुकसानीची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे.

राधानगरी धरणाचे २ दरवाजे अजूनही सुरू आहेत. जिल्ह्याच्या पश्चिम भागामध्ये थांबून थांबून हलक्या स्वरूपात पाऊस सुरू आहे. पूर्व भागातील अनेक तालुक्यांमध्ये ढगाळ हवामान व ऊनही पडल्याचे चित्र आहे. आतापर्यंत वीस हजार हेक्टरहून अधिक शेती पाण्याखाली आहे. पाणी जास्त दिवस शेतात साचल्याने खरीप पिकांचे पूर्ण नुकसान अटळ बनले असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. जिल्ह्यात भात, ऊस, सोयाबीन, भुईमुग पीक पाण्याखाली आहे. याचा सर्वाधिक फटका ऊस पिकाला बसला आहे. जिल्ह्यात ३०० हून अधिक गावांमधील अंदाजे २५ हजार हेक्टर पिकाऊ शेती पुरात बुडाली आहे. आणखी काही दिवस पुराचे पाणी ओसरले नाही, तर पिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसणार आहे. नदीकाठच्या ऊस पिकला सर्वाधिक फटका बसला आहे. सुरळीत पाणी गेल्याने आणखी काही दिवस ऊस



पीक पाण्यात राहिल्यास तो कुजण्याची शक्यता आहे.

दूधगंगा, कृष्णा आणि वारणा नदीच्या पुराने हजारो हेक्टर पिके धोक्यात आली आहेत. करवीर तालुक्यात आंबेवाडी, प्रयाग चिखली, आरे, बालिंगे, पाडळी खुर्द, वडणगे, शिंगणापूर, केर्लों, पाडळी बुद्रुक, आडूर, चिंचवाड, गांधीनगर, आरळे, कळंबे तर्फ कळे, नागदेववाडी, सांगरूळ, कुडित्रे, शिये, कोपार्डेसह अन्य अनेक गावातील उसासह अन्य पिके धोक्यात आली आहेत.करवीर पाठोपाठ गगनबावडा, राधानगरी, हातकणंगले, शिरोळ, पन्हाळा आणि शाहूवाडी तालुक्यातील पिकालाही पुराचा तडाखा बसला आहे. तीन वर्षांपूर्वी २०२१ मध्ये महापुरात जिल्ह्यातील ७० हजार हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्र पाण्याखाली गेले होते.

यंदा तुलनेने महापुराचा कमी फटका बसला आहे. असे असले तरी सोयाबीन थेट कुजायलाच सुरुवात झाली आहे. पूर ओसरल्यानंतर पंचनामे सुरू होणार आहेत. सरकारी निकषानुसार ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या पिकांना भरपाई मिळते. मात्र, पाण्याखाली गेलेल्या सर्वच उसाला १०० टक्के भरपाई मिळणे गरजेचे आहे. याबाबत प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अजय कुलकर्णी म्हणाले की, पुरात ३०० हून अधिक गावे पाण्याखाली गेली आहेत. पुराचे पाणी कमी होताच पंचनामे सुरु केले जाणार आहेत आणि त्यानंतरच नुकसानीचा नेमका अंदाज येऊ शकणार आहे.




### महत्वाच्या घटना

१४९८ : पश्चिम गोलार्धात तिसरा प्रवास करताना ख्रिस्तोफर कोलंबस हे त्रिनिदाद बेटांचा शोध लावणारे पहिले युपोपीय ठरले.
१६५७ : मुघलांनी विजापूरचा कल्याणी किल्ला जिंकला.
६५८ : औरंगजेब मुघल सम्राट बनला.
१८५६ : न्यूझीलंडची राजधानी ख्राइस्टचर्चची स्थापना
१९३३ : महात्मा गांधी यांनी साबरमती आश्रम सोडला.
१९३७ : के. नारायण काळे यांनी दिग्दर्शित केलेला 'वहाँ' हा 'प्रभात'चा चित्रपट मुंबईतील 'मिनर्व्हा' टॉकीजमधे प्रदर्शित झाला.
१९४८ : भारतात कलकत्ता शहरात प्रथम राज्य सेवा परिवहनाची स्थापना करण्यात आली.
१९५४ : इटालियन गिर्यारोहकांनी के-२ (मांऊट गॉडविन ऑस्टिन) हे जगातील दुसर्या क्रमांकाचे शिखर प्रथमच सर केले.
१९५६ : कसोटी सामन्यातील एका डावात सर्व १० गडी बाद करण्याचा विक्रम करणारा जिम लेकर हा पहिला गोलंदाज बनला. या कसोटी सामन्यात त्याने १९ बळी घेतले.
१९८२ : सोवियत संघाने आण्विक चाचणी केली.
१९६४ : रेंजर ७ अंतराळ यानाने चंद्राचे पहिले स्पष्ठ छायाचित्रे काढले.
१९९२ : जॉर्जियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९२ : भारत रत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय सतारवादक पं. रविशंकर यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर
२००० : वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर आणि प्रगत तंत्रज्ञान केंद्राचे डॉ. डी. डी. भवाळकर यांना एच. के फिरोदिया पुरस्कार जाहीर
२००१ : समाजात मूलभूत स्वरुपाची क्रांतिकारक जडणघडण करण्यासाठी झटणार्या व्यक्तींना देण्यात येणारा 'राजर्षी शाहूमहाराज समता पुरस्कार' दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना जाहीर
२००६ : फिदेल कॅस्ट्रो यांनी आपल्या भावाला, राऊल यांच्याकडे सत्ता हस्तगत केली.
२०१२ : मायकेल फेल्प्स यांनी ऑलिम्पिकमध्ये जिंकलेल्या सर्वाधिक पदक जीकाण्याचा विक्रम मोडला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७०४ : गॅब्रिअल क्रॅमर स्विस गणिती (मृत्यू: ४ जानेवारी १७५२)
१८०० : फ्रेडरिक वोहलर जर्मन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ सप्टेंबर १८८२)
१८७२ : लक्ष्मण रामचंद्र पांगारकर संतसाहित्याचे अभ्यासक, चरित्रकार व गाथा संपादक (मृत्यू: १० नोव्हेंबर १९४१)
१८८० : धनपतराय श्रीवास्तव ऊर्फ 'मुन्शी प्रेमचंद' हिन्दी साहित्यिक. त्यांनी १५ कादंबर्या व ३०० कथा लिहील्या. त्यांचे २४ कथासंग्रह प्रसिद्ध झाले. (मृत्यू: ८ आक्टोबर १९३६)
१८८६ : फ्रेड क्विम्बी अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (मृत्यू: १६ सप्टेंबर १९६५)
१९०२ : केशवा तथा के. शंकर पिळ्ळे व्यंगचित्रकार व लेखक, भारतातील राजकीय व्यंगचित्रांचे जनक, पद्मविभूषण (१९७६), 'चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट' आणि 'शंकर्स इंटरनॅशनल डॉल्स म्युझियम' यांचे संस्थापक (मृत्यू: २६ डिसेंबर १९८९)
१९०७ : दामोदर धर्मानंद कोसंबी प्राच्यविद्या पंडित, गणितज्ञ, विचारवंत व इतिहासकार (मृत्यू: २९ जून १९६६)
१९१२ : मिल्टन फ्रीडमन नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: १६ नोव्हेंबर २००६)
१९१८ : डॉ. श्रीधर भास्कर तथा 'दादासाहेब' वर्णेकर संस्कृत पंडित (मृत्यू: १० एप्रिल २०००)
१९१९ : भारतीय क्रिकेटपटू हेमू अधिकारी यांचा जन्म. (मृत्यू: २५ ऑक्टोबर २००३)
१९४१ : अमरसिंग चौधरी गुजरातचे मुख्यमंत्री (मृत्यू: १५ ऑगस्ट २००४)
१९५४ : भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक मनिवंनान यांचा जन्म. (मृत्यू: १५ जून २०१३)
१९६५ : जे. के. रोलिंग हॅरी पॉटर मुळे प्रसिद्ध झालेल्या इंग्लिश लेखिका
१९९२ : आहारतज्ज्ञ श्रेया आढाव यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७५० : जॉन (पाचवा) पोर्तुगालचा राजा (जन्म: २२ आक्टोबर १६८९)
१८०५ : भारतीय सैनिक धीरान चिन्नमलाई यांचे निधन. (जन्म: १७ एप्रिल १७६५)
१८६५ : जगन्नाथ ऊर्फ 'नाना' शंकरशेठ दानशूर व शिक्षणतज्ञ, आधुनिक मुंबईचे शिल्पकार (जन्म: १० फेब्रुवारी १८०३)
१८७५ : अँड्र्यू जॉन्सन अमेरिकेचे १७ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २९ डिसेंबर १८०८)
१९४० : भारतीय कार्यकर्ते उधम सिंग यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १८९९)
१९६८ : शतायुषी पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर चित्रकार, संस्कृतपंडित, वेदांचे अभ्यासक-संशोधक विद्वान व लेखक. चारही वेदांच्या शुद्ध संहिता, समग्र सार्थ महाभारत, सार्थ अथर्ववेद इ. ग्रंथ त्यांनी लिहिले. ते हिन्दी, मराठी, गुजराती भाषांत प्रसिद्ध झाले. यांपैकी काही ग्रंथांचे अनुवाद ऊर्दू, कानडी, सिंधी, तेलगू व इंग्रजीमध्येही झाले. (जन्म: १९ सप्टेंबर १८६७)
१९८० : मोहम्मद रफी पार्श्वगायक, पद्मश्री (जन्म: २४ डिसेंबर १९२४ कोटला सुलतान सिंग, पंजाब)
२०११ : रोमन कॅथोलिक चर्चचे धर्मगुरू जोसेफ अल्बर्ट रोजारियो यांचे निधन.
२०१४ : भारतीय पत्रकार आणि लेखक नबरुण भट्टाचार्य यांचे निधन. (जन्म: २३ जून १९४८)

## जेएनपीएच्या बंदरात कृषी माल प्रक्रिया आणि साठवण यंत्रणा सुरु होणार



शेतकऱ्यांना होणार फायदे!

मुंबई : उरणनजीकच्या शेवा बंदराच्या परिसरातील २७ एकर जमिनीवर कृषी मालावर एकात्मिक पद्धतीने प्रक्रिया करून साठवणुकीची व्यवस्था पुरवणारे केंद्र उभारण्याचा निर्णय जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने घेतला आहे. मोठ्या प्रमाणात दर्जेदार उत्पादन घेऊनही साठवणूक तसेच प्रक्रिया केंद्राची सुविधा नसल्यामुळे कृषी मालाची परदेशात विक्री न करू शकणाऱ्या शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळणार आहे. अशा प्रकारचा हा देशातील पहिलाच प्रकल्प असणार आहे.

कृषी उत्पादनात भारत जागतिक पातळीवर दुसऱ्या स्थानी असला तरी उत्पादित होणाऱ्या कृषी मालापैकी जेमतेम अडीच टक्के मालाचीच निर्यात भारतातून होते. कृषी मालाच्या निर्यातीत जागतिक क्रमवारीत भारत आठव्या क्रमांकावर आहे. यामागे सर्वात मोठे कारण कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या आणि साठवणूक करणाऱ्या केंद्रांची कमतरता हे आहे. या पार्श्वभूमीवर जेएनपीएतर्फे उभारण्यात येणारा हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तर कर्नाटक, तेलंगणा या राज्यांतील शेतकऱ्यांनादेखील या प्रकल्पाचा लाभ होणार आहे. देशातील कृषी उत्पादन व निर्यातीचा तीन वर्षे सखोल अभ्यास करून अद्यायावत सोयीसुविधांनी सज्ज असलेला हा प्रकल्प सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर चालवण्यात येणार आहे. यासाठी २८५ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून शीतगृह, प्रक्रियागृह उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी साठवण केंद्रासह प्राथमिक प्रक्रिया केंद्र, निर्यात मालाचे धुरीकरण, उत्पादनाचे एकत्रीकरण, दर्जानुसार निवड, पॅकिंग आदी सुविधा असणार आहेत. या प्रकल्पाची उभारणी एप्रिल २०२५ मध्ये सुरू होऊन सव्वा ते दीड वर्षाच्या कालावधीत प्रकल्प सुरू होण्याचे अपेक्षित आहे.

## साखरेचा हमीभाव वाढणार, हंगामापूर्वी साखर कारखानदारांना दिलासा शक्य

पुणे : या वर्षीच्या साखर हंगामापूर्वीच साखरेच्या हमीभावात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाचे सचिव संजीव चोप्रा यांनीच तसे संकेत एका कार्यक्रमात दिल्याने कारखानदारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. दरम्यान, २०१९ मध्ये साखरेचा हमीभाव प्रती क्विंटल २९०० रुपयांवरून ३१०० रुपये करण्यात आला.

तेव्हापासून साखरेच्या हमीभावात वाढ झालेली नाही. दुसरीकडे उसाच्या एफआरपीत मात्र दरवर्षी वाढ होत गेली. त्या तुलनेत साखरेच्या दरात वाढ न झाल्याने कारखानदारांना एफआरपी देण्याबरोबरच कर्जाचे हप्ते भरताना अडचणी येत आहेत. ऑल इंडिया शुगर ट्रेड असोसिएशनच्या शनिवारी (दि २७) झालेल्या बैठकीत चोप्रा यांनी साखरेच्या हमीभाव वाढीवर भाष्य केले.

ते म्हणाले, २०१९ पासून साखरेचा हमीभाव प्रती क्विंटल ३१०० रुपयेच आहे. मात्र, दुसरीकडे उसाच्या एफआरपीत सातत्याने वाढ होत आहे.

त्यामुळे आम्ही साखरेचा हमीभाव वाढवण्याबाबत गांभीर्याने विचार करत आहे. याचा निर्णय लवकरच घेतला जाईल. गेल्या वर्षी देशभरात उसाचे क्षेत्र ५७ लाख हेक्टर होते, यावर्षी हे क्षेत्र ५८ लाख हेक्टर आहे. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी साखर उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. वाढलेले क्षेत्र आणि साखर उत्पादन लक्षात घेता साखर कारखान्यांना वाढीव एफआरपी द्यायची झाल्यास साखरेच्या हमीभावात वाढ अपेक्षित आहे. साखरेचा हमीभाव किमान ४२०० रुपये प्रती क्विंटल करावा. अशी मागणीही याच बैठकीत उद्योजकांतर्फे करण्यात आली. कृषी मंत्रालय विविध फिडकॉस्टमधून इथेनॉल उत्पादनासाठी पाण्याच्या आवश्यकतेचे मूल्यांकन करण्यासाठी संशोधन करत आहे. प्राथमिक निकषांनुसार उसातील इथेनॉलला मका आणि तांदळाच्या इथेनॉलपेक्षा कमी पाण्याची आवश्यकता असू शकते, अशी माहितीही चोप्रा यांनी या बैठकीत दिली.

ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात निर्णयाची शक्यता

अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाच्या सचिवांनीच साखरेच्या हमीभाव वाढीचे संकेत दिल्याने आता साखर उद्योगाचे लक्ष केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाकडे लागले आहे. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात होणाऱ्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर निर्णय होण्याची शक्यता आहे.




## मिरची पिकातील पांढरी माशी नियंत्रण

मिरची पिकांमध्ये पांढरी माशीचा खुप मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव दिसून येतो. वातावरणातील सतत होणारे बदल, आर्द्रता, उष्णता याचा परिणाम म्हणून रसशोषक किडींचा वाढता प्रादुर्भाव दिसून येतो. मिरची पिकांबरोबरच ईतरही पिकांमध्ये पांढरी माशीचा खुप मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. याचे कारण म्हणजे बदलत्या वातावरणाबरोबर दिवसेंदिवस कमी होत चाललेली जमिनिची सुपिकता आणि यामुळेच कमी होत असलेली पिकांची ही रोगप्रतिकारक क्षमता त्यामुळे सर्व प्रकारच्या रसशोषक किडींचा सर्व पिकांवर वाढता प्रादुर्भाव दिसून येत आहे.

ओळख व लक्षणे : पांढरी माशी ही कीड टोमॅटो, मिरची, वांगी, कोबी व फळ पिकांवर आढळते. या किडींचा आकार ०.५ मिमी पेक्षा कमी असतो. रंग भुरकट पांढरा व डोळ्याचा रंग लाल असतो. या किडींच्या पंखावर पांढरी भुकटी असते. कोश व किडींचा आकार फुगीर, गोलाकार असतो. पिल्ले व प्रौढ शरीरावर केस असतात. ही कीड पिल्ले व प्रौढ या दोन्ही अवस्थेत पानांतील रस शोषण करते. त्यामुळे पानांचा रंग पिवळसर होतो. या किडीच्या जास्त उद्रेकामुळे फुलगळ होते व फल धारणा होत नाही आणि पांढऱ्या माशीचे नियंत्रण करणे खूप जास्त आवश्यक बनते.

जीवनक्रम : ३० दिवसांचा (अंडी, पिले, कोष आणि प्रौढ) पांढरी माशी किडीची मादी पानांच्या खालच्या बाजूला १५० ते २०० पर्यंत अंडी घालते. १० दिवसात अंडी उबवून त्यातून पिल्ले बाहेर पडतात. ही पिल्ले योग्य वास्तव्य



शोधण्यासाठी झाडावर भटकतात. वास्तव निश्चित झाल्यावर वनस्पतीच्या पेशी जलात आपली सोंड खुपसून त्यातील रस शोषण करतात. या किडीची पूर्ण वाढ ७० ते ७५ दिवसात होते. वाढ झालेली कीड कोषावस्थेत जाते. ही अवस्था १६० दिवस असते. त्यातुन नंतर पांढरी माशी बाहेर पडते.

प्रादुर्भावाची लक्षणे : पानांच्या कडा खालील बाजूस वळतात. तसेच पाने पिवळी पडतात. पिले आणि प्रौढ पानातील रस शोषून घेतात. तसेच पांढऱ्या माशीच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या पारदर्शक चिकट द्रवावर काळ्या बुरशीची वाढ होते. ही कीड पर्णगुच्छ (लीफ कर्ल) या विषाणूजन्य रोगाचा प्रसार करते.

जैविक नियंत्रण : बिव्हेरिया बॅसियाना + व्हर्टिसिलियम लेकॅनी किंवा मेटारायझिम ॲनिसोपली या जैविक उत्पादनाची ४ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे घेऊन फवारणी करावी.

सेंद्रिय नियंत्रण :आयएफसी निम (१०००० ) किंवा गार्डप्लस किंवा निमकरंज अधिक फ़िश ऑईल या सेंद्रिय कीटकनाशकांची १.५ मिली प्रति लीटर पाणी यांप्रमाणे दर ७ ते १० दिवसाच्या कालावधीत फवारणी घ्यावी.

रासायनिक नियंत्रण : रोपवाटिकेत रोपे उगवल्यानंतर अडमायर, बायर, इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली अधिक धानुस्टीन, धानुका, कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणीसाठी वापर करावा. पुर्नलागवड वेळी रोपांची मुळे खालील औषधाच्या द्रावणात बुडवावीत. रेजेंट, बायर, फिप्रोनिल (५% ) १.५ मिली किंवा ॲक्टरा, सिजेंटा, थायामेथोक्झाम ( २५% ) ०.४ ग्रॅम प्रति लिटर पाणी यांप्रमाणे घ्यावे. लागवडीनंतर अरेवा,धानुका, थायमेथोक्झाम (२५%) ०.४ ग्रॅम १ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावे. लागवडीनंतर फळे येण्यापूर्वी पेगासस, सिजेंटा, डायफेन्थुरान (५० पी.डब्ल्यू.पी.) १ ग्रॅम किंवा वेटसिट, धानुका, फेनप्रोपॅथ्रीन (३० ईसी) १ मिली. प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणीसाठी घ्यावे. अन्य उपाय : जमिनीची सुपीकता वाढविण्याच्या दृष्टीने जमिनीची मशागत व खत व्यवस्थापन व्यवस्थित रित्या करावे. पिकास संतुलित खते देऊन पिकांची रोग प्रतिकारशक्ती वाढवावी. नत्रयुक्त खतांचा अतिवापर टाळून, संतुलित वापर करावा. पुर्नलागवडीच्या वेळी मुख्य पिकांच्या कडेने पाच ते सहा ओळी मका, चवळी आणि झेंडू लावावा. निंबोळी पेंड हेक्टरी ४०० ते ५०० किलो या प्रमाणात जमिनीत / मातीत मिसळून वापरावी. पिवळ्या व निळ्या रंगाचे चिकट सापळे प्रति एकरी १० ते २० याप्रमाणे लावावेत. पांढरा, पिवळा, काळा किंवा निळ्या रंगाचे प्लॅस्टिक मल्चिंग केल्यास पांढऱ्या माशीचे प्रमाण कमी राहते.

# मांजरा धरण मृत साठ्यातून बाहेर, एक टक्के जिवंत पाणी साठा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

लातूर, बीड, धाराशिव या तीन जिल्ह्याच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या धनेगाव (ता. केज) येथील मांजरा धरण क्षेत्रात पावसाळ्याच्या दोन महिन्याच्या कालावधीत केवळ ८ दलघमी इतका पाणी साठा वाढला आहे. तर धरण हे मृतसाठ्यातून बाहेर आले असून धरणात १.०३ टक्के जिवंत पाणी साठा आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात चांगले पडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

केज तालुक्यातील धनेगाव येथील २२४.०९३ दलघमी साठवण क्षमतेच्या मांजरा धरणातून लातूर शहर, लातूर एमआयडीसी, अंबाजोगाई, केज, धारूर, कळंब या पाच शहरासह येडेश्वरी साखर कारखाना, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साखर कारखान्यासह केज, कळंब, लातूर तालुक्यातील ६३ गावांना पाणी पुरवठा केला जातो. या सर्व पाणी पुरवठा योजनांना वर्षभर २५ दलघमी इतके पाणी पुरविले जाते. तर ६१ गावांतील शेतकऱ्यांना सिंचनासाठी लाभ मिळत आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह सिंचनाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या मांजरा धरणात गतवर्षी अल्प पाऊसकाळ झाल्याने अपेक्षित पाणी साठा झाला नव्हता. तर धरणातील उपलब्ध पाणी साठ्याचा विचार करून गतवर्षी ऑगस्ट महिन्यापासून धरणातील पाणी पिण्यासाठी आरक्षित केले होते. त्यानंतर २४ मे पर्यंत जिवंत साठ्यातील पाणी पिण्यासाठी पुरविण्यात आले होते. २५ मे रोजी धरण हे मृत साठ्यात गेल्याने मृत साठ्यात ४७.१३० दलघमी इतके पाणी शिल्लक राहिले होते.

यंदा पावसाने सुरवात चांगली केल्याने पेरण्या वेळेवर झाल्या. पुढे ही पाऊस पडत आहे. मात्र गतवर्षी तालुक्यातील लहान – मोठे तलावांनी तळ गाठला होता. हे तलाव भरल्यानंतर नद्या भरून वाहतात. या नद्यांचे पाणी मांजरा नदीतून धरणात जाते. त्यानंतर धरणात पाण्याची आवक होते. आणखी मांजरा नदी वाहत नसल्याने धरणात पाण्याची आवक झालेली नाही. मात्र धरण क्षेत्रात दोन महिन्यांच्या कालावधीत झालेल्या ५१४ मिलिमीटर पावसाने धरणाच्या पाणी साठ्यात ८.११ दलघमी इतकी वाढ झाली असून धरण हे मृत साठ्यातून बाहेर आले आहे. धरणात आता १.०३ टक्के जिवंत पाणी साठा झाला आहे. भविष्यातील पिण्याच्या पाण्यासह सिंचनाच्या दृष्टीने येणाऱ्या काळात मोठे पाऊस पडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून परतीच्या पावसावर धरण ओव्हरफ्लो होत असल्याने परतीच्या पावसाकडे लक्ष लागणार आहे.

## दोन महिन्यात केवळ ८ दलघमी पाणी वाढले



धरणात सध्या १.८२१ दलघमी इतका जिवंत पाणी साठा असून धरणातील उपलब्ध ४८.९५१ दलघमी इतके पाणी सहा महिने पुरते. मात्र भविष्यातील पिण्याचे पाणी व सिंचनाच्या दृष्टीने धरणात अपेक्षित पाणी साठा होणे महत्वाचे आहे.

सूरज निकम, शाखाधिकारी, मांजरा धरण, धनेगाव.

## श्रीक्षेत्र अरणचा विकास हाच सावता परिषदेचा ध्यास –आखाडे



बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र अरण विकासाच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम सावता परिषदेने केले ही बाब कोणीच नाकारू शकत नाही.शेवटच्या श्वासापर्यंत श्रीक्षेत्र अरण विकासाची लढाई लढत राहणार.श्रीक्षेत्र अरणचा विकास हाच सावता परिषदेचा ध्यास असल्याचा निर्धार कल्याणराव आखाडे यांनी व्यक्त केला.

टाका ता. अंबड जि.जालना येथे संतशिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीसोहळा निमित्ताने पारंपरिक अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभी विणा पूजनासाठी सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांना निमंत्रित करण्यात आले होते.प्रसंगी बोलतांना कल्याणराव आखाडे म्हणाले की,सावता परिषदेची स्थापना माळी समाजाच्या हिता– अस्मितेच्या प्रश्नांचा जागर करण्यासाठी झाली आहे.श्रीक्षेत्र अरण प्रश्नाला पहिल्यांदा सावता परिषदेने वाचा फोडली आहे.सावता परिषदेच्या माध्यमातून अनेक श्रीक्षेत्र अरण येथे सरकारला यावे लागले.सरकार पक्षातील अनेक मंत्री पहिल्यांदाच अरण याठिकाणी सावता परिषदेमुळे आले त्यातून अनेक विकास कामे मार्गी लागली. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सावता परिषदेने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांना निवेदन दिले आहे.भविष्यातही श्रीक्षेत्र अरण चा लढा सावता परिषद अविरतपणे सुरू ठेवणार आहे.यावेळी राधाकृष्ण जायकर, सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ राजीव काळे यांची उपस्थिती होती.मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## धारूर घाट रुंदीकरणाचा प्रश्न सुटेना

### साखर वाहतूक करणारा ट्रक दरीत कोसळला

धारूर । प्रतिनिधी

धारूरच्या घाटामध्ये अपघाताचे सत्र सुरूच आहे साखरेची वाहतूक करणारा ट्रक खामगाव पंढरपूर महामार्गावरील धारूर येथील घाटामध्ये अवघड वळणावर चालकाचां ताबा सुटल्यामुळे शंभर फूट खोल दरीत ट्रक कोसळला.

गेल्या अनेक दिवसापासून रखडलेला रुंदीकरणाचा प्रश्न मार्गी लागत नाही केंद्रीय मंत्री खासदार आमदार व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी करूनही १३ किलोमीटरचा अरुंद घाटाचे रुंदीकरण झाले नाही त्यामुळे हा घाट अपघाताचे हॉटस्पॉट झाला आहे विविध सामाजिक संघटना व पत्रकार यांनी लोकप्रतिनिधींकडे याबाबत पाठपुरावा करूनही या प्रश्नाकडे गांभीर्याने न पाहिल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढतच चालले आहे काल मध्यरात्री धारूर मार्गे माजलगाव कडे जाणारा ट्रक घाटातील नागमोडी वळणावर चालकाचा ताबा सुटल्यामुळे दरीत कोसळला. या अपघातात ट्रक चे मोठे नुकसान झाले आहे. लोकप्रतिनिधी घाट रुंदीपणाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून लवकरात लवकर हा प्रश्न सोडवावा अशी मागणी तालुक्यातील विविध सामाजिक संघटना व पत्रकार बांधव हे करत आहेत.



सकल मराठा समाजाच्या वतीने नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे यांना धारूर घाटाच्या रुंदीकरणाच्या प्रश्नाबाबत प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले आहे त्यांनी लवकरच याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन घाट रुंदीकरणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन दिले आहे

ईश्वर खामकर सामजिक कार्यकर्ते.

## लोकअदालतीत दाखल प्रकरणे २०३ व दाखल पूर्व ११ निकाली

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्हा विधी सेवा समिती माजलगाव व जिल्हा वकिल संघ माजलगाव यांच्या संयुक्त विद्यामाने लोकन्यायालयात दाखल प्रकरणे २०३ व दाखल पुर्व प्रकरणे ११ निकाली निघाली आहेत. या लोकन्यायालयात पाच पँनल ठेवण्यात आले होते मा.बी.जी धर्माधिकारी साहेब जिल्हा न्यायाधिश –१ माजलगाव यांनी पँनल क्रमांक १ वर काम पाहिलेश्री एस. डी.धनवट साहेब दिवाणी न्यायाधिश व.स्तर माजलगाव यांनी पँनल क्रमांक २ वर काम पाहिले,मा.बुधवंत साहेब सह दि.न्या.व.स्तर माजलगाव यांनी पँनल क्रमांक ३ वर काम पाहिले श्री आर ए सावंत साहेब दि.न्या. क.स्तर माजलगाव यांनी पँनल क्रमांक ४ वर काम पाहीले

आर एस गोसावी यांनी पँनल क्रमांक ५ वर काम पाहीले यांच्या



न्यायालयात नियमित दिवाणी दावा ३३१/२०२४ सोनाली अभय थावरे विरुद्ध वर्षा निवृत्ती थावरे मालकी हक्क घोषित डिक्लेरेशनचा दावा वादीचे वकील बी.एस.घोडे व प्रतिवादीचे विधीज्ञ डी.जी.जाधव वादी व प्रतिवादी यांच्यात संगनमताने तडजोड झालेली आहे दावा निकाली काढण्यात आलेला आहे प्रतिवादी हा अपंग असल्यामुळे न्यायाधिश श्रीमती गोसावी मँडम यानी स्वतः प्रतिवादी यांच्याकडे जाऊन वादी व प्रतिवादी याच्यात तडजोड केली हे लोकन्यायालय यशस्वी करण्या साठी वकील संघाचे अध्यक्ष बि.आर.डक व वकील संघाचे सदस्य यांनी परिश्रम घेतले.

## केतन राठोड रांना तात्काळ निलंबित करा

### रुक्मिणी नागापुरे : बलात्कार प्रकरणातील पिडीतेसह नातेवाईकांना धमक्या

बीड। प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील किट्टीअडगाव येथील ९ वीच्या वर्गात शिक्षण घेत घेतलेल्या १४ वर्षीय मुलीवर अतिप्रसंग केलेल्या आरोपींसह यामध्ये आरोपीस मदत करणार्यांनाही सहआरोपी करण्याच्या मागणीसाठी एकल महिला संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय बीड येथे निवेदन देण्यात आले. व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणीही यावेळी करण्यात आली. तसेच आरोपींना पाठीशी घालणार्रा केतन राठोड व सोनटक्के रांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे एकल महिला संघटनेच्या वतीने करण्यात आली.

माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव ह मू चिंचगव्हान येथे काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली असून याकडे मात्र प्रशासकीय यंत्रणा आरोपींना पाठीशी घालत असल्याचा आरोप एकल महिला संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. पिडीतेला लवकरात लवकर न्याय देवून आरोपींना पाठीशी घालणारांनाही निलंबित करण्याची मागणी एकल महिला संघटनेच्या रुक्मीनी नागापुरे यांनी केली आहे. यासह मुख्य आरोपींना अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, आरोपींना पाठीशी घालणार्रा पोलीस केतन राठोड व सोनटक्के यांना वतात्काळ निलंबित करावे, तर पीडित मुलीच्या कुटुंबाला आरोपी पासून धोका आहे यासाठी पोलीस संरक्षण मिळावे, पीडित मुलीला न्याय देऊन नुकसान भरपाई मिळावी, अतिथी लॉज रांचा परवाना रद्द करावा व हॉटेलच्या मालकाला सहआरोपी करण्यात यावे. रावेळी एकल महिला संघटनाच्या बीड जिल्ह्यातील तारा घोडके, लता सावंत, मोहिनी बाबर, अनिता ढोरमारे, शिल्पा साबळे, मंगल कानडे, रुक्मिणी नागापुरे, प्रजावती जोगदंड, शारदा सोनवणे, उजवला खंडागळे, कौशल्या कळसुले, शिल्पा पंडित, संगिता मेटे, चित्रा पाटील, आशालता पांडे दुर्गा गवळी आदी महिला उपस्थित होत्या.



## वसंतदादा पाटील महाविद्यालयात फळे आणि बिस्किटाचे वाटप



पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने चुंबळी फाटा येथील हनुमान व्यायाम शाळा आणि वाघिरा येथील भीमसिंह गड, 'ताल महल' आश्रमामधील विद्यार्थ्यांना ३० जुलै रोजी कै. सोनाजीराव क्षीरसागर उर्फ नाना यांच्या पुण्यतिथी निमित्य फळे आणि बिस्किटाचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रोफेसर डॉ. आबासाहेब हांगे यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून हनुमान व्यायाम शाळेचे वस्ताद आवारे तात्या, ह.भ.प. केशवजी महाराज जगदाळे गुरुजी यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे म्हणाले की, कै. नानांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये दिलेल्या भरीव योगदानामुळे ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाची सोय झाली. ही मुले शिकून विविध क्षेत्रामध्ये नावलौकिक मिळवून बीड जिल्ह्याचे नाव उंचावत आहेत. बीड जिल्ह्याच्या ग्रामीण परिसरामध्ये आज झालेला जो शैक्षणिक विकास आहे याचा इतिहास लिहिताना कै. नानाचे कार्य अधोरेखित केल्याशिवाय हा इतिहास पूर्ण होऊ शकणार नाही.कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. सतीष माउलगे, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, उन्नत समाज निर्मिती कक्षाचे प्रा. हमराज उईके, प्रा. शरद पवार, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, प्रा.विठ्ठल शिंदे, प्रा.पिंटू रोडे, प्रा. सी.जी. शिंदे, प्रा. सतीष कदम, प्रा विमल आलापुरे इत्यादींची उपस्थिती होती.

## निकृष्ट रस्ता बनविणाऱ्या गुत्तेदाराचा परवाना रद्द करा–आदर्श तरकसे

बीड । प्रतिनिधी

शहरातील पंचशील नगर प्रभाग क्रमांक २२, पद्मपाणि प्रतिष्ठान कार्यालयासमोरील १५ फुटी रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट करण्यात आले आहे. थोड्याच दिवसात रस्त्याला भेगा पडून रस्ता खचू लागला आहे. हा रस्ता पुन्हा नव्याने बनविण्यात यावा तसेच संबंधित अभियंत्याला निलंबित करून रस्ता बनविणाऱ्या गुत्तेदाराचा परवाना रद्द करण्यात यावा. अशा मागण्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर उपाध्यक्ष आदर्श तरकसे यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहरातील प्रभाग क्रमांक २२ मध्ये पंचशील नगर येथे असलेल्या पद्मपाणि प्रतिष्ठान कार्यालयासमोरील १५ फुटी रुंद रस्त्याचे काँक्रिटीकरण नुकतेच काही दिवसापूर्वी करण्यात आले.



काँक्रिटीकरण करताना येथे लोखंडी सळ्या टाकण्यात आल्या नाहीत. सदरील काँक्रिटीकरण हे अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने काही दिवसातच हा रस्ता तडे जाऊन खचू लागला आहे. विशेष म्हणजे यापूर्वीही जेव्हा काँक्रिटीकरण करण्यात आले होते तेव्हाही अशाच पद्धतीने काही दिवसातच हा रस्ता भेगा पडून खचला होता. तशाच अवस्थेत तो अनेक वर्षे ठेवण्यात आला आणि आता कुठे काही दिवसांपूर्वी पुन्हा या रस्त्याचे नव्याने काँक्रिटीकरण करण्यात आले. मात्र यावेळीही गेल्या वेळेस सारखेच पुन्हा या रस्त्याला काँक्रिटीकरणानंतर काही दिवसातच भेगा पडून तळे जाऊ लागले आहे. हा रस्ता निकृष्ट केल्याने संबंधित गुत्तेदार व अभियंत्यांवर कायदेशीर कडक कारवाई करण्यात यावी. संबंधित अभियंत्याला निलंबित करून रस्ता बनवणाऱ्या गुत्तेदाराचा परवाना रद्द करण्यात यावा तसेच हा रस्ता पुन्हा एकदा नव्याने लोखंडी सळ्या टाकून बनविण्यात यावा. अशा मागण्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर उपाध्यक्ष आदर्श तर कसे यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना दिलेल्या निवेदनातून केल्या आहेत.

## मुलांच्या विकासासाठी पालकांनी लक्ष घालणे आवश्यक: प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी

अंबाजोगाई। प्रतिनिधी

आपल्या पाल्याच्या केवळ भौतिक गरजा पुरवणे एवढीच पालक म्हणून आपली जबाबदारी नसून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी छोट्या छोट्या गोष्टीत लक्ष घालणे आवश्यक आहे .असे प्रतिपादन खोलेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केले . ते येथील खोलेश्वर महाविद्यालयातील व्यवसाय शिक्षण विभागाच्या पालक मेळाव्यात बोलत होते .

याप्रसंगी व्यासपीठावर व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य डॉ. रवींद्र कुंबेफळकर, पर्यवेक्षक प्रा.योगेश कुलकर्णी व कार्यालयातील श्री मोती सर यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ.देवर्षी म्हणाले की, आपल्या पाल्याला ज्ञानासोबतच गुणांनीही समृद्ध करणे गरजेचे आहे. आमच्या महाविद्यालयात या दोन्हीसाठी प्रयत्न केला जातो. असे सांगून विद्यार्थ्यांच्या विकासात पालकांची काय भूमिका असली पाहिजे यावर भाष्य करून महाविद्यालय व एकंदर संस्थेविषयी पालकांना माहिती सांगितली. प्रास्ताविक



करताना उपप्राचार्य डॉ.कुंबेफळकर म्हणाले की, बदलत्या काळात पालकांनी आपल्या पाल्यांकडे फार काळजीने लक्ष दिले पाहिजे. मोबाईलचा वापर ,सोशल मीडियाचा वापर, त्यांची संगत यावर विशेष लक्ष दिले पाहिजे. महाविद्यालयातही शिक्षक– पालक योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष दिले जाते. शिक्षकांच्या संपर्कात राहून आपल्या पाल्याच्या विकासात पालकांनी योगदान दिले पाहिजे असे मत मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनिता बर्दापूरकर यांनी केले तर आभार प्रा. रमेश वैद्य यांनी मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्येष्ठ पालक व महिला पालक यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमासाठी जवळपास ५२ पालकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी प्रा. विनय राजगुरू, अजय दुबे यांनीही परिश्रम घेतले.

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमत्त वर्गनितून बिंदुसरा नदीचे स्वच्छता

बीड। प्रतिनिधी

बीड शहराच्या सौंदर्यात भर टाकणारी बिंदुसरा नदी शहराच्या मधोमधून गेली आहे.परंतू नदीत वाढलेली झाडे–झुडपे, नदीशेजारी टाकलेला कचरा आणि लोकांनी केलेले अतिक्रमण यामुळे बिंदुसरा नदी आहे की, ओढा असा प्रश्न पडतो. बिंदूसरेच्या नामशेष होण्याला बीड नगर परिषद कारणीभूत आहे. कारण बिंदुसरा नदीला कोट्यवधींचा निधी येवूनही बिंदूसरेचा कोंडलेला स्वास मात्र मोकळा झाला नाही. त्यामुळे बिंदुसरा नदीची ही अवस्था पाहून साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे समन्वयक अजिंक्य चांदणे यांनी जयंती वर्गणीतून दहा जेसीबीद्वारे बिंदुसरेच्या दोन्ही बाजूस एक किलोमीटरचे नदीपात्र स्वच्छ करुन घेतले आहे. त्यामुळे साहित्यसम्राट गौरव महोत्सवाने एक आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळेच अण्णाभाऊंच्या या लेकरांना खरंच मानलं पाहिजे असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.

बीडमध्ये साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाला सोमवार (दि.२९) जुलै रोजी सुरुवात झाली. हा महोत्सव १ ऑगस्टपर्यंत विविध उपक्रम राबवून पार पडणार आहे. त्या अनुषंगाने सोमवारी दहा जेसीबीच्या साह्याने बिंदुसरा नदीपात्र स्वच्छ करुन या महोत्सवाला सुरुवात झाली.यावेळी जयंती समितीच्या अध्यक्षा सुशिला मोराळे,समन्वयक अजिंक्य चांदणे, अमृत सारडा, कल्याण आखाडे, शेख निजाम,गणेश वाघमारे, रामसिंग टाक, शंकर विठकर, सुभाष लोणके, सतीश विठकर,अमर ढोणे,विजय चांदणे, विलास बामणे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवर म्हणाले की, बीड शहरामध्ये महाराष्ट्र राज्याला आदर्श निर्माण करुन देईल असा महोत्सव दरवर्षी साजरा केला जातो. त्या अनुषंगाने या वर्षी देखील जयंती उत्सव समितीकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. ही बाब कौतुकास्पद आणि गौरवाची आहे. डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष तथा जयंती उत्सव समितीचे समन्वयक अजिंक्य चांदणे नेहमीच आदर्शवत संकल्पना आणि कल्पना राबवून साहित्यसम्राट गौरव महोत्सव साजरा करतात. आज आपल्या सर्वांच्या हस्ते बिंदुसार नदीपात्र स्वच्छता अभियानाचे उदघाटन होत आहे. त्याचा प्रत्येकाला कमालीचा आनंद आहे. असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी मोलाचे परिश्रम घेतले.




**जाहीरनामा**

**धारुर येथील श्रीमती ए.बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारूर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १७९/२०२४**

**नीलाबाई व इतर ३ वि. निरंक**

अर्जदार यांनी मयत महिपति भागोजी काजगुंडे मौजे आसरडोह ता. धारुर जि.बीड हे दिनांक १९/०२/२०२३ रोजी आसरडोह ता. धारुर जि.बीड येथे मयत झाल्याचे नमुद केले आहे. त्यांच्या पश्चात अर्जदार क्र १ नीलाबाई भ्र. महिपति काजगुंडे, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. आसरडोह ता. धारुर जि.बीड, अर्जदार क्र २. प्रल्हाद महिपति काजगुडे, वय ३२ वर्षे, धंदा शेती रा. सदर, अर्जदार क्र. ३. सिंधु प्र. नामदेव काळे, वय ३४ वर्षे, धंदा शेती रा. सदर, अर्जदार क्र. ४. लता प्र. तुळशीराम गडदे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरफळी, ता. धारुर जि. बीड यांनी अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आणि अर्जदार क्र. ३ व ४ हया मयताच्या मुली या नात्याने त्यांना शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत महिपति भागोजी काजगुंडे यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की. जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु महिपति भागोजी काजगुंडे यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आज दिनांक: २४/०७/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**

**पुढील तारीख : ०३/०९/२०२४**

स्वाक्षरित
सी.के. पवार
क लिपीक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर

# केरूळमध्ये सशस्त्र दरोडा; दरोडेखोरांच्या हल्ल्यात एक गंभीर जखमी

## आठ दिवसांत दुसरा दरोडा; पोलीसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह







**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील केरुळ येथील टेंभीच्या माळाजवळील भागवत वस्तीवर दरोडेखोरांनी दशहत माजवत सशस्त्र दरोडा टाकला.अमानुषपणे मारहाण करत दरोडखोरांनी सुमारे लाखों रुपयांचा रोख रकमेसह मुद्देमाल लूटला.या हल्ल्यात राजू महादेव भागवत (वय ३०) यांच्यावर सुमारे १९ चाकुचे वार झाल्याने त्यांना अहमदनगर येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.सोमवारी मध्यरात्रीनंतर हा प्रकार घडला.

याबाबत दादासाहेब महादेव भागवत वय (३१ वर्षे) रा.भागवत वस्ती, केरुळ यांच्या फिर्यादीवरून, राहत्या घरी ज्ञात पाच ते सहा चोरट्यांनी फिर्यादी व फिर्यादीच्या घरातील इतर व्यक्ती पडवीत झोपलेले असतांना घरात प्रवेश करून फिर्यादीच्या पत्नी,आई व मुलगा यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढुन,फिर्यादीला काठीने मारहान करुन,फिर्यादीची बहीण व भाची झोपलेल्या घरात घुसुन त्यांच्या अंगावरील मणी मंगळसुत्र ओढुन घेऊन, कपाटातील एक सोन्याची अंगठी चोरुन त्यांना मारहाण करत चोरट्यांनी १,७७,५००/- (अक्षरी एक लाख सत्याहत्तर हजार पाचशे रुपये) मुद्देमाल तसेच फिर्यादीच्या भावास चाकुने डोक्यात, पाठीवर, पायावर, पोटात सपासप वार करुन त्यास गंभीर जखमी करुन फिर्यादी कडील वरील वर्णनाचे सोन्याचे दागीने जबरदस्तीने दरोडेखोर पसार झाले आहेत फिर्यादी वरून गुन्हा दाखल झाला असून स.पो.नि.हिंगे यांचे आदेशाने पुढील तपास कामी स पो.नि. नरवडे हे करत आहेत.

### पीडित कुटूंबाला माजीमंत्री सुरेश धस यांच्याकडून तात्काळ मदत

सोमवारच्या रात्री ७ ते ८ दरोडेखोराकडून भागवत कुटुंबाला अमानुषपणे मारहाणीची घटना माजी मंत्री सुरेश धस व चिरंजीव जयदत्त धस यांना रात्रीच्या २ वाजल्याच्या दरम्यान दूरध्वनीवरून झाकीर शेख या कार्यकर्त्यांनी सांगितल्यानंतर या घटनेची तात्काळ दखल घेत घटनास्थळी माजीमंत्री सुरेश धस यांनी पोलीस प्रशासन व आरोग्य यंत्रणाला सूचना करत या कुटुंबाच्या मदतीला तात्काळ पाचारण केले. आधार देत जखमी असलेल्या राजू भागवत यांना तात्काळ अहमदनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी हलवले. मंगळवारी सकाळीच माजी मंत्री सुरेश धस यांचे चिरंजीव सागर धस यांनी घटनास्थळी भेट देऊन पीडित भागवत कुटुंबाला आधार दिला. मागील काही दिवसांपूर्वी डोंगरकिन्ही,टेंभुर्णी,किन्ही आता काल रात्री केरूळ व चिखलीनाथ या ठिकाणी असे जमावाने येऊन दरोडेखोराने अमानुषपणे मारहाण करून कुटुंबचे कुटूंब लुटण्याचे जे प्रकार घडत आहेत हे अतिशय दुर्दैवी आहे. असा अनेक घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.मी स्वतः गृहमंत्र्याची भेट घेऊन या घटनेची सखोल चौकशी करण्याचे विनंती करणार असल्याचेही माजीमंत्री सुरेश धस यांनी प्रसार माध्यमाशी बोलताना सांगितले.

# धारूर तालुक्यात शेतकऱ्याची आत्महत्या

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील तरुण शेतकरी गणेश भागवत रुद्रे वय ३८ वर्ष यांनी शेतीसाठी घेतलेले कर्ज भरता येत नसल्यामुळे व मुलांच्या शिक्षणाच्या काळजीपोटी दिनांक १९ जुलै रोजी शेतात कापूस फवारणीसाठी आणलेले औषध पिऊन आत्महत्या केली.

गेल्या वर्षी कमी पाऊस झाल्यामुळे मराठवाड्यामध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली होती त्यामुळे जमिनीमधून म्हणावे तसे उत्पन्न शेतकऱ्यांना काढता आले नाही पहाडी पारगाव येथील गणेश भागवत रुद्रे या तरुण शेतकऱ्याने शेतीमध्ये पीक घेण्यासाठी वडिलांच्या नावावर माजलगाव येथील खाजगी बँकेचे दहा लक्ष रुपयाचे कर्ज घेतले परंतु सततच्या नापिकीमुळे बँकेचे हप्ते वेळेवर भरण्यास अडचण येत होती बँकेचे कर्मचारी हप्ता भरण्यासाठी तगादा लावत होते परंतु जवळ काहीच पैसे नसल्यामुळे हप्ते भरणे शक्य नव्हते .तसेच आपल्या दोन मुली व एका मुलांचे शिक्षण चांगले व्हावे म्हणून जात प्रमाणपत्र काढण्यासाठी तहसीलदारांमार्फत माजलगावच्या उपविभागीय कार्यालयात कोळी महादेव जातीचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रस्ताव दाखल केला होता परंतु तेथील अधिकारी व कर्मचारी हे सतत चकरा मारूनही मुलांचे जात प्रमाणपत्र मिळत नव्हते त्यामुळे त्याला आपल्या मुलांच्या भविष्याची ही सतत काळजी वाटायची कर्जाची हत्ती कसे करू? मुलांचे शिक्षण कसे? असा सतत विचार मनात येत असे यातून आलेल्या नैराश्यतून शेतकऱ्याने शेतात फवारणीसाठी आणलेले औषध पिले लातूर येथे उपचार करत असताना दुर्दैवी मृत्यू घडल्याची घटना घडली या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे त्यांच्या पश्चात पत्नी ,दोन मुली व एक मुलगा आई वडील असे कुटुंब आहे.

# पिंपळनेरात गटारी तुंबल्याने दुर्गंधी आरोग्य धोक्यात : स्वच्छतेचा बोजवारा

**पिंपळनेर प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेर गणपतीचे येथील ,भीमज्योत नगर ,घाटुळ गल्ली ,आणेराव गल्ली ,काळे गल्ली येथील,नाल्या व गटारी, गेल्या दोन-तीन वर्षापासून भरल्या असून,रस्त्यावरच घाण पाणी येत आहे,सर्वत्र दुर्गंधी सुटली असून डासांचा त्रास होत आहे. गटारीची स्वच्छता वेळोवेळी होत नसल्याने इथे स्वच्छेतेचा बोजबारा उडाला आहे. गटारीत साचलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत आहे. सोबतच दुर्गंधीमुळे देखील लोक बेजार झाले आहेत. डासांमुळे डेंग्यूसारख्या

साथीच्या आजारांना निमंत्रण मिळत आहे. अनेक ठिकाणी डबकी साठल्याने डासांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. अनेक ठिकाणी पाईपलाईनचे लिकेज असल्यामुळे दूषित पाणी पुरवठा होत आहे.सध्या तरी,ग्रामपंचायत ने दुरुस्ती करण्यात केली आहे.त्याचबरोबर गावातील इतरही मुख्य रस्त्यासमोरील गटारी तुंबल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. ग्रामपंचायतीने त्वरित नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून नाल्याची स्वच्छता करावी व कायमस्वरूपी एक शिपाई स्वच्छता करण्यासाठी नियुक्त करावा. गटारी स्वच्छतेसाठी पावसाळ्यापूर्वीच मिटींग घेण्यात आली तरीही गटारीची स्वच्छता करण्यात आलेली नाही.

नागरिकांना वेळेत सेवा सुविधा मिळत नसल्याने ग्रामस्थांत नाराजी आहे. ग्रामसेवक गावच्या विकासाकडे दुर्लक्ष करत असल्याने गावात विकासकामे झालेली नाहीत.

# कर्ज फेडण्याच्या नावारवाली जमीन विक्रीचा डाव हाणून पाडणार -नारायण होके पाटील

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीची जमीन कर्ज फेडण्याच्या नावाखाली विक्रीचा घाट घातल्याचे दिसून येत आहे वास्तविक पाहता माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती ही उत्पन्नाच्या बाबतीत मराठवाड्यात नंबर दोनवर आहे असे असताना उत्पन्नातून कर्ज फेडण्या ऐवजी जमीन विक्रीचा ठराव कुणाचे घर भरण्यासाठी घेण्यात आला याची सविस्तर माहिती देऊन जमीन विक्रीची प्रक्रिया तात्काळ



थांबवावी अन्यथा काँग्रेस पक्षाचे वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील शहराध्यक्ष अफरोज तांबोळी एड इनामदार दत्ता कांबळे शेख अहेमद शेख जानुशा,गणेश चोरमले करामा चाऊस यांनी दिला

# केज विधानसभा मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार इंजि. एन.डी. शिंदे यांनी घेतली शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांची भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे पक्षाच्या नेत्या श्रीमती सुषमा अंधारे या केज शहरात आल्या असतांना त्यांची भेट केज विधानसभा मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार इंजि एन डी शिंदे यांनी त्यांची शासकीय विश्रामगृह येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी माजी आमदार सुनील धांडे जिल्हाध्यक्ष रत्नाकर शिंदे , उपजिल्हा प्रमुख शिवाजी कुलकर्णी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



इंजि एन डी शिंदे (नवनाथ शिंदे) हे केज विधानसभेची निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत.त्यानिमित्ताने ते जिल्ह्यातील विविध नेत्यांच्या गाठीभेटी घेत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून एन डी शिंदे यांनी नुकतीच शिवसेनेच्या नेत्या श्रीमती सुषमा अंधारे यांची विविध नेते तथा कार्यकर्त्यांसह भेट घेतली. यावेळी उभयतांमध्ये जिल्ह्यातील तथा केज मतदार संघातील विविध विषयांवर सखोल अशी चर्चा करण्यात आली. याप्रसंगी केज विधानसभा निवडणुकीच्या साठी उमेदवारी मिळयाल्यानंतर शिंदे यांना भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी शिवसेनेच्या वतीने मेहनत घेऊन प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रयत्न घेयू असे आश्वासन शिवसेना पक्षाच्या वतीने इंजि एन डी शिंदे यांना देण्यात आले.

# तीन कोटीचा मुद्देमाल जप्त, वाळू तस्कराचे धाबे दणाणले

## सपोनि नारायण एकशिंगे व तहसीलदार संदीप खोमणे यांचीवाळू तस्करांवरती संयुक्त दबंग कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे तसेच गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली होती की, चकलांबा पोलिस ठाणे हद्दीतील राक्षस भवन येथील नदीपात्रात सहा ते सात हवा वाळू भरण्या कामी येणार आहेत त्याप्रमाणे सापळा लावून सिताफिने गावकऱ्यांच्या मदतीने ◀◀ पान ३ वर



# आष्टीत बनावट मतदार नाव नोंदणी,माजी आमदार धोंडे यांची राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी मतदारसंघात शेजारील जिल्ह्यातील मतदारांची बोगस कागदपत्रांच्या आधारे बनावट मतदार नावनोंदणी चालू आहे याची निवडणूक आयोगाने गांभीर्याने दखल घ्यावी अशी मागणी माजी आ. भिमराव धोंडे यांनी केली आहे . याबाबत बीडचे जिल्हाधिकारी आणि राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे .



याबाबत राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे करण्यात आलेल्या तक्रारीत माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, आष्टीच्या तिन्ही बाजूने अहमदनगर जिल्ह्याची सीमा आहे. या लगतच्या गावात मतदान वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यापूर्वीच्या काही निवडणुकीत मतदार वाढवून कार्यक्षेत्रा बाहेरील मतदारांनी मतदान केले होते . आष्टी विधानसभा मतदारसंघात प्रशासनाच्या सहकार्याने आवश्यक मतदानाची जुळवाजुळव करून बनावट कागदपत्रांच्या आधारे स्थानिक रहिवासी नसलेल्या बाहेरील मतदारांची ◀◀ पान ३ वर

# निराधारांना तात्काळ अनुदान सुरु करा

## विजयसिंह पंडित यांची मागणी, तहसिलदारांना दिले लेखी निवेदन

**गेवराई । प्रतिनिधी**

संजय गांधी निराधार अनुदान योजना यासह विविध निराधार योजनेत हजारो प्रस्ताव गेवराई तहसिल कार्यालयात मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे पात्र निराधारांवर उपासमारीची वेळ येत आहे. त्यामुळे तात्काळ पात्र निराधारांना नियमित अनुदान सुरु करण्याची कार्यवाही करावी अशी मागणी बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी केली आहे. निष्क्रीय विरोधकांकडून निराधारांच्या प्रश्नांबाबत होत असलेली दिशाभूल आणि अपप्रचार थांबविण्याचे आवाहन सुध्दा त्यांनी केले आहे.



संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी हजारो पात्र लाभार्थ्यांनी गेवराई तहसिल कार्यालयात परिपूर्ण प्रस्ताव दाखल केलेले आहेत. निराधारांच्या प्रस्तावाबाबत प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर दिरंगाई होत आहे. हजारो पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव केवळ प्रशासनाने वेळेवर कार्यवाही न केल्यामुळे अनुदानापासून वंचित आहेत. पात्र लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान मंजुर करावे अशी मागणी बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी केली आहे. गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणावर निराधारांकडून अनुदान मंजुरीसाठी पैसे घेण्याचे काम काही दलालींनी केले आहे. हेच दलाल राजकीय स्वार्थासाठी माझ्या नावाचा गैरवापर करत असल्याचा आरोप विजयसिंह पंडित यांनी केला आहे. निराधारांच्या प्रश्नासाठी आपण सदैव तत्पर असून पात्र लाभार्थ्यांना शासन अनुदानाची रक्कम मिळाली पाहिजे यासाठी वेळोवेळी संघर्षाची भुमिका आपण घेतली असल्याचे विजयसिंह पंडित यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे सांगितले आहे.

# ओबीसींचा राजकीय चेहरा अद्याप जन्माला आला नाही - ॲड.प्रकाश आंबेडकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

ओबीसींचा राजकीय चेहरा अद्याप जन्माला आला नाही. जे आहेत ते फक्त जातींचे चेहरे आहेत. त्यामुळे ओबीसी समाजाची एकजूट झाली नाही. असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड प्रकाश आंबेडकर यांनी केले.

अंबाजोगाई येथे आद्यकवी मुकुंदराज सभागृहात ॲड.प्रकाश आंबेडकर यांची ओबीसी आरक्षण बचाव यात्रा अंबाजोगाईत पोहोंचली. यावेळी झालेल्या जाहिर सभेत ॲड.आंबेडकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वंचितच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकुर, अंबाजोगाई ओबीसीचे अध्यक्ष ॲड.किशोर गिरवलकर, ॲड.अरविंद मोटेगांवकर, दिनेश परदेशी, बालासाहेब शेप, बिभिषण चाटे, विलास चाटे, राजेश पंडीत, वंचितचे बीड जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे





अंबाजोगाईत आरक्षण बचाव यात्रेनिमित्त निघाली मोटार सायकल रॅली

यांच्यासह मान्यवरांची मंचावर उपस्थित होती.

यावेळी बोलताना ॲड.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, ओबीसींना मिळालेले आरक्षण काढून घेतले जात आहे. मात्र याला कोणतेही राजकिय पक्ष विरोध करत नाहीत. ५५ लाख ओबीसी प्रमाणपत्र वितरीत झाले. हे चुक आहे कि बरोबर आहे हे सांगण्यास कुणी धजावत नाही. मनोज जरांगे पाटील यांना यांच्या मागणीनुसार आरक्षण द्यायचे की नाही हा राजकिय विषय आहे. मात्र हा विषय सोडविण्याकडे राजकिय पक्षांचे दुर्लक्ष होत आहे. सरकारने ओबीसी व मराठा समाज यांना एकाच ताटात आरक्षण नको तर दोघांना वेगवेगळी ताटे द्या. अशी भूमिका आंबेडकरांनी मांडली.

चटका बसता तेंव्हाच लोक जागे होतात. अशी स्थिती आता ओबीसी समाजाची झाली आहे. ओबीसी समाजाचा राजकिय चेहरा अजून जन्माला आला नाही. जे आहेत. ते त्या-त्या समाजाचे चेहरे आहेत. ओबीसींचे आरक्षण वाचवायचे असेल तर येत्या विधानसभा निवडणूकीत शंभर विधानसभेच्या जागा निवडून आल्या पाहिजे. हे लक्ष ओबीसींनी समोर ठेवले पाहिजे. यावेळी वंचित आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकुर, ॲड.किशोर गिरवलकर, बिभीषण चाटे यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेश कांबळे यांनी केले. सभेपुर्वी अंबाजोगाई शहरातून भव्य मोटार सायकल रॅली काढण्यात आली होती.

### ७ ऑगस्ट मंडल दिवस म्हणून साजरा करा

७ ऑगस्ट या दिवशी तत्कालीन पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांनी सामाजिक परिवर्तन करणारे मंडल कमिशन ओबीसींसाठी लागू केली. म्हणून ७ ऑगस्ट हा दिवस मंडल दिवस म्हणून देशभर साजरा करा. असे आवाहन ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात पुन्हा सापडलं ड्रग्ज

## २१ लाखांच्या मेफेड्रोनसह दोन तरुणांना अटक, कात्रजमधून उचललं

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेल्या पुणे शहरात गेल्या काही महिन्यांपासून होत असलेल्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे या शहराचं नाव वेगळ्याच दृष्टीने चर्चेत आहे. पोर्शे अपघाताच्या घटनेनंतर पुण्यातील बेकायदा पब आणि बार रेस्टॉरंटचा मुद्दा समोर आला होता. राज्य सरकार व पोलीस प्रशासनाने याची दखल घेत कारवाईही सुरू केली. मात्र, त्यानंतर काही दिवसांताच पुण्यातील एका हॉटेलमध्ये तरुणाई ड्रग्ज घेतल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. या घटनेने पुन्हा एकदा पुण्यातील ड्रग्जच्या रॅकेटचा मुद्दा समोर आला होता. आता, पुन्हा एकदा कात्रज परिसरात १०६ ग्रॅम मेफड्रोन सापडल्याने पुणे शहराला आणि येथील तरुणाईला झालंय काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, पोलिसांनी या ड्रग्जसह दोन तरुणांना अटक केली आहे. पुण्याच्या कात्रज परिसरातून २१ लाखांचे मेफेड्रोन जप्त करण्यात आलं असून पोलिसांनी राजस्थानमधील दोघांना अटक केली आहे. कात्रज परिसरात मेफेड्रोन (एमडी) विक्री करण्यासाठी दोन तरुण आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार, सापळा रचून ड्रग्जची विक्री करणाऱ्या राजस्थानमधील दोन तरुणांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. आरोपीच्या ताब्यातून २१ लाख ३८ हजार रुपयांचे १०६ ग्रॅम मेफेड्रोनसह व दुचाकी असा २२ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. श्रवणसिंग बलवंतसिंग राजपूत (वय २२, मूळ रा. नयानगर, जि. बाडमेर, राजस्थान) आणि महेश पुनाराम बिश्नोई (वय २०, मूळ रा. कुशलावा, जि. जोधपूर, राजस्थान) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. हे दोघे सध्या खराडी परिसरातील तुळजाभवानीनगरमध्ये राहतात. राजपूत आणि बिश्नोई मेफेड्रोन विक्रीसाठी कात्रज परिसरात दुचाकीवर येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यांची झडती घेतली असता २१ लाख रुपये किमतीचे १०६ ग्रॅम मेफेड्रोन आढळून आले. या दोघा आरोपींविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात एनडीपीएस क्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पुण्यातील ड्रग्जच्या घटनेवरुन आमदार रविंद्र धंगेकर व शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांनी राज्य सरकार व पोलीस प्रशासनाला लक्ष्य केलं होतं. पोलीस अधिकाऱ्यांना हफ्ते पोहोचत असल्यानेच पुण्यातील ड्रग्ज व पब संस्कृती वाढत असल्याचा गंभीर आरोपही या नेत्यांनी केला होता. त्यानंतर, पोलिसांनी धडक कारवाई मोहिम हाती घेतल्याचं दिसून आलं. त्यातच, आता कात्रज परिसरातूनही दोघांना अटक करण्यात आली आहे.



# लोणावळ्यातील दुहेरी हत्याकांडाचा सात वर्षांनी निकाल; आरोपीची निर्दोष मुक्तता

**पुणे । प्रतिनिधी**

लोणावळ्यात महाविद्यालयीन तरुण तरुणीच्या दुहेरी हत्याकांडातील आरोपी सलीम शब्बीर शेखची परिस्थितीजन्य पुरावे संशयास्पद असल्याने प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी निर्दोष मुक्तता केली.

तब्बल सात वर्षांनी या प्रकरणाचा निकाल लागला आहे. बचाव पक्षातर्फे ड. अफरोज शेख यांनी काम पाहिले. दरम्यान या निकालाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील करणार असल्याचे विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी दिली. हे प्रकरण परिस्थितीजन्य पुराव्यावर होते, मात्र, परिस्थितीजन्य पुरावे संशयास्पद आहेत. पोलिसांनी आरोपीचा मोबाईल, त्याचा आयएमईआय क्रमांक आणि मोबाइलच्या रंगाची महिती मिळविली. मात्र, ती कोठून मिळविली. तसेच, आरोपींचे स्केच बनविले. मात्र, त्यासाठी माहिती कोठून घेतली, हे समजू शकले नाही. खून केल्याची माहिती आरोपींना मित्रांना दिली होती, मात्र, दोन महिन्याच्या कालावधीत ते गप्प का, हा प्रश्न अनुत्तरीत असल्याचे ड. अफरोज शेख यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.




लोणावळ्यात २०१७ मध्ये आयएनएस शिवाजी समोर आणि भुशी धरणाच्या टेकडीवर सार्थक वाघचौरे आणि श्रुती डुंबरे यांचे मृतदेह हात बांधलेल्या अवस्थेत आढळून आले होते. मृत तरुण आणि तरुणी लोणावळ्यातील सिंहगड महाविद्यालयात अभियांत्रिकीचे विद्यार्थी होते. तरुण अहमदनगरच्या राहुरीचा, तर तरुणी मूळची पुण्याच्या ओतूरची होती. हात बांधून तीक्ष्ण वस्तूवर डोकं आपटल्याने त्यांचा मृत्यू झाला होता. दोघांच्या शरीरावर अनेक ठिकाणी जखमांच्या खुणाही आढळल्या. चोरीच्या उद्देशाने या जोडप्याची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात पाचशेहून अधिक नागरिकांची लोणावळा पोलिसांनी चौकशी केली होती.

# आळंदीमध्ये माऊलींच्या पालखीचे जंगी स्वागत



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे दि.३० रोजी आळंदीमध्ये माऊलींच्या पालखीचे सायंकाळी सव्वासाच्या सुमारास आळंदी नगरपरिषद चौकात माऊलीच्या जयघोषात वरूण राजाच्या हजेरीत आणि भक्तीमय वातावरणात स्वागत झाले. तसेच नगरपरिषदेच्या वतीने माऊलींच्या पालखी रथावर पुष्पवृष्टी करून माऊलींच्या पालखीचे स्वागत करण्यात आले.

माऊलींच्या पालखी स्वागतासाठी आळंदीतील हजारो वारकरी संप्रदायातील विद्यार्थ्यांनी टाळ, मृदंगासह ठीक ठिकाणी हजेरी लावली होती.परतीच्या या वारीत माऊलींच्या आगमनानिमित्त अनेक महिला आणि पुरुष तसेच वारकरी विद्यार्थी फुगडी खेळताना दिसत होते .तसेच या वारीतील भाविक हरिनामाच्या गजरात दंग झाले होते. आळंदी शहरात वारकरी भाविकांना ठिकठिकाणी प्रसादाचे वाटप करण्यात आले.माऊलींच्या पालखी आगमनानिमित्त अनेक आळंदीतील नागरिकांनी यावेळी हजेरी लावली होती.आळंदी (हवेली भाग) धाकटी पादुका येथे बँड बाजाच्या वाद्यात ,फटाक्यांच्या आतिषबाजीत तसेच पुष्पवृष्टीत माऊलींच्या पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले.पुणे ते आळंदी माऊलींच्या पालखी सोहळ्याने वरुणराजाच्या हजेरीत प्रवास केला.

# एल थ्री बारमध्ये ड्रग सेवन करणाऱ्या तरूणास जामीन

**पुणे । प्रतिनिधी**

जंगली महाराज रस्त्यावरील लिक्विड लीजर लाउंज (एल थ्री) बार मधील ड्रग्ज पार्टी प्रकरणातील व्हायरल व्हिडीओत ड्रगचे सेवन करणार्या करण राजेंद्र मिश्रा यास सत्र न्यायाधीश जे. जी. डोरले यांच्या न्यायालयाने जामीन मंजूर केला. त्याने अ‍ॅड. अमेय बलकवडे यांमार्फत जामिनासाठी अर्ज केला.

मिश्रा याचे नाव एफआयआरमध्ये नाही. त्याकडून कोणत्याही प्रकारचे ड्रग हस्तगत करण्यात आले नाही. त्याविरोधात यापुर्वी कोणताही गुन्हा नाही. तो एका खाजगी कंपनीमध्ये अभियंता असून तो पुण्याचा रहिवासी असल्याचा युक्तिवाद अ‍ॅड. बलकवडे यांनी केला. त्यांना अ‍ॅड. मयूर मराठे, अ‍ॅड ऋषिकेश कडू, अ‍ॅड. रोहित गुजर, अ‍ॅड. सुरज शिंदे यांनी सहकार्य केले. न्यायालयाने सरकार पक्षासह बचावपक्षाचा युक्तिवाद ऐकून घेत विविध अटी शर्तींवर जामीन मंजूर केला. एलथ्री बारच्या टॉयलेटमध्ये ड्रगसेवन करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर शिवाजीनगर पोलिसांनी मिश्रा याला अटक केली होती. प्राथमिक चौकशीदरम्यान त्याने ड्रगचे सेवन केल्याची कबुली दिली होती. त्यानंतर, याप्रकरणात १५ जणांविरोधात अटकेची कारवाई करण्यात आली.

# साखर आयुक्तालयावर कामगारांचा ७ ऑगस्टला मोर्चा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील साखर व जोडधंद्यातील कामगारांच्या वेतनवाढीच्या कराराबाबतच्या त्रिपक्षीय समितीच्या कराराची मुदत ३१ मार्च रोजी संपली आहे. नवीन समिती गठित करण्यासाठी शासनाकडे गेली पाच महिने पाठपुरावा करुनही काहीच हालचाली होत नाही. त्यामुळे शासनाचे व साखर संघाचे लक्ष वेधण्यासाठी ७ ऑगस्ट रोजी साखर आयुक्तालयावर 'इशारा मोर्चा' काढण्याचा इशारा देत महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाने आक्रमक भुमिका घेतली आहे.

साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सोमवारी (दि. २९) साखर आयुक्त डॉ. कृणाल खेमनार यांची साखर संकुल येथे भेट घेतली आणि मागण्यांचे निवेदन देऊन चर्चा केली. त्यावेळी वेतनवाढीसाठी तत्काळ त्रिपक्षीय समिती गठित करण्याची मागणी करीत मोर्चाचा इशारा देण्यात आला. शिष्टमंडळात संघटनेचे कार्याध्यक्ष राऊसाहेब पाटील, सरचिटणीस शंकरराव भोसले, कोषाध्यक्ष प्रदीप बनगे, राजेंद्र तावरे, संजय मोरबाळे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, संघटनेने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, कामगार मंत्री सुरेश खाडे व अन्य मंत्र्यांनाही निवेदन देत मागण्यांकडे लक्ष वेधले आहे.



# पंचनाम्यासाठी आलेल्या तलाठी महिलांना शिवसेनेच्या महिलांकडून संरक्षण

**पिंपरी । प्रतिनिधी**

मिलिंदनगर,बौद्धनगर,भाटनगर येथील रहिवाशांच्या घरांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने स्थानिक नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले होते. शासनाच्या वतीने पंचनामा करण्यासाठी चार तलाठी महिला अधिकारी तिथे आल्या होत्या त्यांना तेथील नागरिकांनी लोकांनी सहकार्य केले नाही. काहिंनी कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. हे समजल्यानंतर त्याठिकाणी शिवसेनेच्या स्थानिक महिला पदाधिकारी पोहचल्या आणि त्यांनी नागरिकांना समजावून सांगत महिला अधिकाऱ्यांना संरक्षीत केले.

या परिसरात पुराच्या पाण्यामुळे नुकसान झाले आहे. त्यासाठी काही तलाठी महिला अधिकारी पंचानाम्यासाठी या परिसरात आले होते. यावेळी काही लोक दारू पिऊन महिला अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावून जाऊन शासकीय काम करण्यास अडथळा निर्माण करत होते. हे समजतास शिवसेनेच्या स्थानिक महिला पदाधिकारी दीपा जोगदंड (उप शहर संघटिका पिंपरी) यांनी शिवसेनेच्या वरिष्ठ पदाधिकारी यांना याबाबत माहिती दिली. त्यावर शिवसेनेच्या महिला पदाधिकारी शैला पाचपुते महिला जिल्हाप्रमुख,सायली साळवी युवती सेना उपजिल्हाप्रमुख, शिलाताई भोंडवे, कविता शिंदे, सविता वाघमोडे, कांचन पाल या त्वरित त्या ठिकाणी पोहोचल्या. त्यांनी रहिवासी नागरिकांना समजावून सांगून सर्कल अधिकारी व तहसीलदार यांना सदर भागात घडलेल्या प्रकाराची माहिती दिली व महिला तलाठी अधिकारी यांना संरक्षीत केले.



# आचार्य अत्रे मराठी नाट्यसृष्टीतील महान नाटककार –डॉ. शिवाजीराव कदम

**पुणे । प्रतिनिधी**

साहित्यसम्राट आचार्य अत्रे मराठी नाट्यसृष्टीतील महान नाटककार होते. युरोपातील श्रेष्ठ नाटककार विल्यम शेक्सपियर यांनी एकुण ३७ नाटके लिहिली व आचार्य अत्रे यांनी २५ नाटके लिहिली. त्यांची नाट्यकृती जोपर्यंत रंगमंचावर आहे, तोपर्यंत ते जिवंत आहेत. लोकप्रिय नाटके लिहिणारे अत्रे म्हणूनच महान होते, असे प्रतिपादन विचार भारती विद्यापीठाचे कुलपती प्राचार्य डॉ. शिवाजीराव कदम यांनी सोमवारी व्यक्त केले.

आचार्य प्र. के अत्रे यांच्या जन्माचे यंदा शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्ताने पुरंदर येथील आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान व भारती विद्यापीठ, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने आचार्य अत्रे नाट्यमहोत्सव पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात आयोजित केला आहे. संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात उदघाटन सोहळा झाला. डॉ. कदम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून नाट्य महोत्सवाची सुरुवात झाली. उदघाटनप्रसंगी डॉ. कदम बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी डॉ. डी.वाय.पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील होते. यावेळी आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर व अत्रे प्रेमी शशिकांत इनामदार, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मुख्य अभियंता रामदास तांबे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उद्योजक गोविंद पानसरे, भरत नाट्य संशोधन मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग मुखडे, काँग्रेसच्या महिला अध्यक्ष सायली नढे उपस्थित होते.




# नागरिकांचे झालेले नुकसान भरून निघेल का?

## आदित्य ठाकरे यांचा सरकारला

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड रस्ता - नागरिकांना सांगितलं त्यापेक्षा जास्त पाणी धरणातून सोडण्यात आले आहे. त्यानंतर लगेचच वीज पुरवठा खंडित करण्यात आला. तळमजला, पहिला मजला पाण्यात गेला, त्यामुळे नागरिकांचे मोठे प्रमाणात नुकसान झाले आहे. पंचनामे झाले; मात्र यातून नागरिकांचे झालेले नुकसान भरून निघेल का? नागरिकांना कायमस्वरूपी उपाययोजना मिळालीच पाहिजे, असे मत माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केले.



२५ जुलै रोजी एकता नगरी परिसरात आलेल्या पूर परिस्थितीची पाहणी आदित्य ठाकरे यांनी केली त्यावेळी ते बोलत होते. नदी सुधार प्रकल्प अंतर्गत सुरू असलेल्या कामांना स्थगिती देण्यात आली होती. तरीही हे काम करण्यात आले. गुजरात मधील नद्या वेगळ्या आहेत तर महाराष्ट्रातील नव्या वेगळ्या आहेत. इथल्या नद्यांचा अभ्यास करून काम करणे अपेक्षित होते.

पुणे महापालिकेत अद्यापही नगरसेवक नाही. निवडणुका झाल्या नाहीत. राडारोडा टाकला जातो त्यावर कोणाचेही अंकुश नाही. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार या ठिकाणी संरक्षित भिंत बांधण्याचा प्रस्ताव आहे मात्र ती मंजूर कधी होणार त्याला पुरेसा निधी उपलब्ध होणार का? नेमक्या कशा करणार आहेत याबाबत अद्यापही कोणतीही स्पष्टता मिळाली नाही.

व्यवसायिकांसाठी पूरेषा बदलली आहे चुकीचे निकष बऱ्याच ठिकाणी लावले गेले आहेत या सगळ्याची आधी चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली. आदित्य ठाकरे यांनी परिसरातील सोसायटीच्या नागरिकांची भेट घेतली. यावेळी शिवसेना उबाठा गटाचे सर्व पदाधिकारी तसेच महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# निरगुडसर येथे अपघातात दोघांचा मृत्यू

**आंबेगाव । प्रतिनिधी**

भरधाव जाणाऱ्या पिकअप वाहनाने रस्त्यावरील मागून जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नागापूर-वळती (ता. आंबेगाव) रस्त्यावर घोड नदीच्या पुलाजवळ कोळी फाटा येथे सोमवारी(ता. २९) रात्री सव्वाआठ वाजण्याच्या सुमारास घडली. यामध्ये दुचाकीस्वार सोपान एकनाथ दिघे (वय ३३, रा. वळती) व सोबत असणाऱ्या ओळख न पटलेली अज्ञात व्यक्ती, अशा दोघांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताला कारणीभूत ठरलेल्या पिकअप चालक अभिषेक खंडू जाधव (रा. वळती) याच्यावर पारगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

नागापूर येथील कोळी फाट्यावर असणाऱ्या रस्त्यावर सोमवारी रात्री सव्वाआठ वाजण्याच्या सुमारास पारगाव येथून आपल्या कामावरून सोपान दिघे हे घरी वळती या ठिकाणी जात होते. त्यांच्या सोबत दुचाकीवर एक अज्ञात व्यक्तीही बसलेला होता. पुलाच्या जवळ काही अंतरावर असताना पाठीमागून मंचर बाजूकडून येणारी पिकअप गाडी (क्र. एम.एच. १४ के.क्यू. ८०७९) वाहनाने सोपान एकनाथ दिघे हे जात असलेल्या दुचाकीला (क्र. एम.एच. १४ आर. ३४९७) पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यामध्ये पिकअपने त्या दोघांमधील एकाला शंभर फूट अंतरावर फरफटत नेले. या अपघातामध्ये सोपान दिघे यांच्या डोक्याला व खांद्यास, तसेच अनोळखी व्यक्तीच्या डोक्यास गंभीर मार लागल्याने दोघांचाही जागीच मृत्यू झाला.

याबाबतची खबर पारगाव पोलिस ठाण्यात नीलेश एकनाथ दिघे यांनी दिली. वळती येथील सोपान दिघे हे पारगाव येथील फरशीच्या दुकानात काम करतात. ते दुकानातून घरी जाताना एकटेच निघाले होते, परंतु अपघात झाल्या ठिकाणी त्यांचा दुचाकीवर एक अज्ञात व्यक्ती बसलेला होता. त्यामध्ये त्या अज्ञात व्यक्तीचाही मृत्यू झाला. परंतु या व्यक्तीचा फोटो पोलिसांनी परिसरातील अनेक गावात पाठवला, परंतु या व्यक्तीची काही ओळख पटलेली नाही. त्यामुळे दिघे यांनी अज्ञात प्रवाशाला लिफ्ट दिली असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

# पीएमपीएमएल चालकांच्या कामबंद आंदोलनामुळे प्रवाशांचे झाले हाल

**पुणे । प्रतिनिधी**

पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारी (दि. २९) पहाटेपासून काम बंद आंदोलन सुरू केले. त्यामुळे सकाळी तीन तास १४८ बस मार्गांवर धावल्याच नाही. त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले. प्रलंबित मागण्या संचालक मंडळासमोर ठेवण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्यानंतर कृती समितीने संप मागे घेतला आणि सेवा सुरळीत सुरू झाली.

सर्व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम विनाविलंब देण्यात यावी. सहा वर्षांपासून सेवेत असणाऱ्या बदली रोजंदारी सेवकांना सेवेत कायम करण्यात यावे. तसेच कर्मचाऱ्यांना वेळोवेळी पदोन्नती देणे अशा तीन मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. दरम्यान, याबाबत शिवसेनेचे प्रमोद भानगिरे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचा कृती समितीने आठ दिवसांपूर्वीच मागण्यांसह आंदोलनाचा इशारा पत्राद्वारे दिला होता. मात्र, प्रशासनाने पत्राची दखल घेतली नाही आणि पहाटे तीन वाजल्यापासून पीएमपीचे कर्मचाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले. यात हडपसरसह निगडी डेपोच्या सर्वाधिक बस बंद होत्या.




बससेवा बंद झाल्यास प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे शिवसेनेच्या वतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे पोलीस आयुक्तालय, स्वारगेट पोलीस स्टेशन, ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय आणि पीएमपी प्राशसनाला मागण्यांसह आंदोलनाबाबतचे पत्र दिले होते. दरम्यान, रोजंदारी सेवकांना कायम करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, सहव्यवस्थापकीय संचालक नितिन नार्वेकर यांना आहेत. या वर्षी फेब्रुवारीमध्ये पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी बदली कर्मचाऱ्यांना कायम करण्याचे उत्तर लेखी स्वरूपात दिले होते. तरीही कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यापासून वंचित ठेवलेले आहे. त्यामुळे आम्ही बेमुदत संपाचे हत्यार उपसले असे कृती समितीने सांगितले.